१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• पुणे, सोमवार ११ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३२५, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL


• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 325, Marathi - Daily - Pune, 11 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## इंडिया आघाडीचा आज निवडणूक आयोगावर मोर्चा



**नवी दिल्ली -** निवडणूक आयोगाविरोधात इंडिया आघाडी आक्रमक झाली असून, उद्या संसद भवन ते निर्वाचन सदन असा मोर्चा आघाडीने आयोजित केला आहे. अलीकडेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांच्या निकालांमध्ये गडबड झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन कर्नाटकमधील विधानसभा निवडणुकीत कशी मतचोरी झाली, हे आकडेवारी आणि पुराव्यासह मांडले. या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. या मोर्चातून मतचोरीची चौकशी, आयोगाने ती कशी होऊ दिली नाही आणि त्यामागे कोणाचा सहभाग होता याबाबत स्पष्टीकरणाची मागणी करण्यात येणार आहे. काँग्रेस, उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार गट यांसह इंडिया आघाडीतील सर्व पक्ष या मोर्चात सहभागी होणार आहेत.



अखिल चंदनवाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा २६ फूट उंच 'गोडगणपती'

# कबुतरांना खायला घालणारच! जैन आक्रमक! मुनींचा इशारा कोर्टाने निर्णय बदलावा! अन्यथा आमरण उपोषण

**कबुतरखान्याच्या प्रश्नावरून जैन समाजाकडून खुलेआम न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान केला जात असतानाच आज राष्ट्रसंत जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी पुढे जात कोर्ट, सरकार आणि पालिकेलाच इशारा दिला की, कोर्टाने निर्णय बदलावा. न्यायालय, महापालिका आणि सरकारने कबुतरांना धान्य द्यायची परवानगी द्यावी. नाहीतर किमान एक लाख जैन बांधवांना घेऊन आम्ही आमरण उपोषणाला बसणार आहोत. वेळ पडल्यास धर्मरक्षणासाठी आम्ही शस्त्रही हाती घेऊ.**

■ मुंबई



**जैन** मुनी निलेशचंद्र विजय आज म्हणाले की, कबुतरखाना प्रकरणात उच्च न्यायालयाने पालिकेला आदेश दिले असून, हे आदेश पालिकेने लागू केले आहेत. पण आमचे आंदोलन सुरूच राहील. आम्ही शांत बसणार नाही. आम्ही आमरण उपोषण सुरू करू. १३ ऑगस्टला याबाबत निर्णय घेऊ. जैन समाज शांतताप्रिय आहे. शस्त्र उचलणे हे आमचे काम नाही. जे लोक शस्त्र उचलतात, ते आमचे नाहीत. मात्र गरज पडली तर धर्मरक्षणासाठी आम्ही शस्त्रही उचलू. आम्ही भारताचे संविधान, न्यायालय आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मान राखतो. परंतु आमच्या धर्माच्या विरोधात काही झाले तर आम्ही न्यायालयालाही मानणार नाही. हे प्रकरण सध्या न्यायालयात सुरू आहे. कबुतरे मरू नयेत, हा आमचा ठाम आग्रह आहे. ९०० कबुतरे मेली. आणखी मरायला नको. सरकारच्या आदेशानंतर पक्षांना खाद्य देण्यास पुन्हा सुरुवात झाली आहे. आमचे पर्युषण पर्व संपल्यानंतर पुढील निर्णय घेऊ. हे प्रकरण चित्रा वाघ आणि मनीषा कायंदे यांनी पुढे आणले. चित्रा वाघ म्हणाल्या की, माझी आत्या, मावशी मेली. मग त्यांना विचारा की, दारू आणि कोंबड्यांमुळे किती लोक मरतात? हेदेखील सांगा. मुंगीपासून ते हत्तीपर्यंत कोणाचाही जीव जाऊ नये, असे आमच्या धर्मात स्पष्ट सांगितले आहे. मी भगवान महावीरांचा अनुयायी आहे. जीवदया हा आमच्या धर्माचा मूलमंत्र आहे. जैन धर्मालाच लक्ष्य का केले जात आहे? काही नेत्यांचे चमचे लोकांना भडकवत आहेत, पण मी कोणत्याही पक्षाचा नाही. आम्ही न्यायालय आणि संविधानाचा आदर करतो. बाबासाहेब आंबेडकरांनी बनवलेल्या संविधानातील कलम २३३ नुसार, पक्षांना पाणी न देणे किंवा त्यांचा जीव घेणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे. तरीही न्यायालय, पालिका किंवा सरकारने आमचे म्हणणे मानले नाही, तर आम्ही संपूर्ण जैन समाजाला जागृत करून मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारू. उपोषण करू. मी एकटा उपोषणाला बसणार नाही. तर देशभरातील एक लाख जैन बांधव उपोषणात सामील होतील. भगवान महावीरांनी सांगितले आहे की शांतिनाथ हे शांततेचे प्रतिक आहेत. म्हणून हे आंदोलनही पूर्णतः शांततेत होईल.

दादर कबुतरखान्याच्या परिसरात कबुतरांना खाद्य घालण्यास मनाई असतानाही नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई सुरू आहे. आज त्या भागात पोलीस बंदोबस्त लावल्याने कुणीही कबुतराला खाद्य देण्यास आले नाही . लालबागमध्ये राहणारे महेंद्र संकलेचा यांनी काल आपली मोटार दादर कबुतरखान्याजवळ नेऊन, गाडीच्या छतावर ट्रे ठेवून कबुतरांना खाणे दिले. यानंतर पोलिसांनी त्यांची गाडी जप्त करून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. कोणीही कबुतरांना दाणे घालू नयेत आणि जर कारवाई झाली तर त्याची जबाबदारी ट्रस्ट घेणार नाही, असा स्पष्ट इशारा या फलकावर देण्यात आला आहे. ट्रस्टने » पान ७ वर

## आजपासून देशातील ११ राज्यांत अतिमुसळधार पाऊस बरसणार

**हवामान विभागाचा हाय अलर्ट जारी**

■ मुंबई

**भारतीय** हवामानशास्त्र विभागाने उद्या सोमवार ११ ऑगस्टपासून देशभरातील ११ राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला असून, हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशातील अनेक भागांमध्ये मान्सूनचा जोर काहीसा मंदावलेला दिसत आहे. पावसाची तीव्रता कमी झाल्यामुळे काही ठिकाणी उष्णतेची चाहूल लागली आहे. मात्र, पुढील आठवड्यात हवामानात मोठा बदल होणार असल्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. स्कायमेट वेदरच्या अहवालानुसार, सोमवारपासून देशभरातील ११ राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात » पान ७ वर

## एकनाथ शिंदे श्रीनगरला सैनिकांसाठी रक्तदान केले

■ श्रीनगर

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे हे आज ठाणे महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्षा मॅरेथॉनमध्ये सकाळी सहभागी होत काही अंतर धावले. यानंतर शिंदे जम्मू-काश्मीर दौऱ्यावर गेले. श्रीनगर विमानतळावर बहिणींनी त्यांचे राखी बांधून स्वागत केले. त्यानंतर त्यांनी भारतीय सैन्यदलाच्या ९२ बेस हॉस्पिटलला भेट देऊन तिथे सिंदूर महारक्तदान यात्रेत सहभागी होऊन » पान ७ वर

## ६५ जागांवर विजयी करून देतो आता संजय राऊतांचा गौप्यस्फोट



■ मुंबई

**शरद** पवार यांना १६० जागा जिंकवून देण्याची ऑफर दिली होती तेच लोक उबाठा प्रमुख उद्धव ठाकरेंनाही भेटले होते आणि त्यांनी ६५ जागा जिंकवून देण्याचीही ऑफर दिली होती, असा गौप्यस्फोट उबाठा खासदार संजय राऊत यांनी केला.

मुंबईत पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, निवडणुकीपूर्वी काही लोकांनी भेटून १६० जागा मिळवून देतो, असे शरद पवार यांनी सांगितले आहे. यापैकी काही लोक लोकसभा निवडणुकीपूर्वी उद्धव ठाकरे यांनाही भेटले होते. आम्ही त्यांना स्पष्ट सांगितले की, आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. त्यावेळी देशातील वातावरण पाहता, » पान ७ वर



# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

दहिसर (ईस्ट) / घोडबंदररोड ठाणे येथे हाऊसकिपिंगसाठी मुले पाहिजेत. 14000/- **9820219764 / 8591074394** {NC251865}

दादर पश्चिमला दहावी, बारावी शिकलेली अनुभवी/बिनअनुभवी ऑफिस असिस्टंट हवी - **8879166871 / 9082148924** {NC251897}

HDFC bank जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार 17500-35000, **7758908779** {NC251893}

मोठ्या प्रमाणात हाऊसकिपिंग पाहिजे. मुलुंड, कांदिवली, अंधेरी मालाड, संपर्क - **8097507698** {NC251899}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251890}

बोरिवली पश्चिम येथे हायड्रॉलिक प्रेसच्या सर्विस आणि रिपेअरिंगसाठी हायड्रोलिक इंजिनिअर/वर्कर पाहिजेत. **9820477791** {NC251770}

बोरिवली पश्चिम येथे कारखान्यात डाय मेकर कारागीर आणि मदतनीस पाहिजेत. **9820477791** {NC251769}

बदलापूर येथे घरासाठी 24 तास महिला हेल्पर पाहिजे. **8446201979** {NC251913}

तोरण - दिवा - ज्वेलरी कामासाठी हेल्पर मुले - मुली पाहिजे. **9820732719** (कांदिवली) {NC251862}

पाहिजे कॉम्प्युटर / ऑफिस स्टाफ, वेब/ग्राफिक्स डिझाईनर्स, हेल्पर, हाऊसकिपिंग **9699924546** {NC251863}

चेंबूरस्थित प्रख्यात इलेक्ट्रिकल सर्व्हिसेस कंपनीला अनुभवी हेल्पर्स त्वरित पाहिजेत. पगार 14000 + पर्क्स. WhatsApp biodata **9892653232** {NC251861}

मालाड (ईस्ट) मधील प्रिंटिंग प्रेससाठी हेल्पर कम डिलिव्हरी बॉईज पाहिजे. 12 तास काम पगार 16000/- **9892106609** {NC251876}

## पाहिजेत

बारावी पास मुले पाहिजेत बाहेरील कामासाठी वय 19 ते 33 विरार ते भाईंदर राहणारे **9969725362 / 9833911797** {NC251912}

कोमोरी लिथ्रोन 26 4 कलर मशीनसाठी प्रिंटर, बॉयलर, कटिंग मशीनसाठी बाईंडर, पॅकिंगसाठी मुली अकाऊंटसाठी मुलगा, मुलगी पाहिजेत. श्री साई ग्राफिक्स, युनिट नं. 2, कृष्णा कंपाऊंड, जय श्रीराम कॉम्प्लेक्स जवळ मानकोली नाका, दापोडे भिवंडी, मो. नं. **7208176822 / 33** {NC251904}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (22,000-75,000) **9820628009 / 9833470199** {NC251844}

**पाहिजेत**

नवीन पनवेल मुंबई येथे ॲग्रो टुरिझम फार्मसाठी अनुभवी

**किचन हेल्पर कम हाऊस किपींग स्टाफ**

पाहिजे. राहण्याची आणि जेवणाची सोय केली जाईल. पगार १५,०००/- संपर्क :- (व्हाट्सअँप कॉल फक्त)

**9082427905 9820607950**

सुरक्षा रक्षकः १२ तास ₹ १४,०००/- माहीम, माटुंगा सेंट्रल **9137835512 / 9870002587** {NC251886}

ठाण्यातील प्रा. लि. कंपनीला विविध पदांसाठी दहावी, बारावी, पदवीधर पास/नापास ३० मुले / मुली कायमस्वरुपी पाहिजेत. (फ्रेशर्सना प्राधान्य) प्लेसमेंट नाही. पगार 15000 - 45000/- **7021534944/ 9819778053** {NC251842}

मुलुंड येथे बँकसाठी फिल्ड कलेक्शन - टेलिकॉलिंग स्टाफ हवा आहे, पगार 12,000/- ते 22,000/- (शिक्षण 10वी, 12वी) संपर्क - **7021506468** {NC251882}

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकिंगसाठी मुले/मुली पाहिजे. जय गणेश, गाळा नंबर - 6, बबन मिश्रा कंपाऊंड सोनावाला क्रॉस रोड नंबर 2, गोरेगांव (पूर्व) - **9820382105 / 9137518551** {NC251687}

## पाहिजेत

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती 15,000/- ते 35,000/- **9702279241** {NC251804}

भिवंडी पडघा येथे प्रिंटींग प्रेस मध्ये KBA Offset मशीनवर काम करण्यास प्रिंटर, फीडरमन व हेल्पर पाहीजेत. तसेच मॅन्युअल पंचींग मशीन, लॅमिनेशन मशीन व पोलार कटींग मशीनसाठी ऑपरेटर पाहीजेत. कल्याण स्टेशनवरून नेण्यासाठी व आणण्यासाठी कंपनीची गाडी असेल.

संपर्क **9224455770**

सिक्युरिटीगार्ड पाहिजेत. ठाकुर्ली स्टेशनजवळ 12 तास 10000/- जाधव. **9820849329** {NC251900}

ई-मेल ट्विटर कॉम्प्युटर ऑपरेटर अनुभवी / पार्लरसाठी/ **9821570599** विलेपार्लेतील {NC251919}

महाराष्ट्रीयन शाकाहारी कुटुंबासाठी 4 वर्षाच्या मुलाला सांभाळण्याकरीता व जेवण बनवण्यासाठी मीरारोड येथे 24 तासासाठी बाई हवी आहे. पगार 13000 ते 15000 संपर्क - **9833959612** {NC251917}

सलूनमध्ये कामासाठी कारागीर पाहिजेत. पगार 12000-17000/- राहण्याची सुविधा. मुंबई - **7021457297 / 8850463091** {NC251918}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC251851}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटाः **8693009342/ 9082787983** {NC251443}

घरबसल्या ड्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट - **9028160157** {NC251846}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**






# जयंती कठाळे

**जयंती कठाळे 'पूर्णब्रह्म'च्या व्यवस्थापकीय संचालिका (एम.डी.) आहेत. पूर्णब्रह्म हा 'मनस्विनी फुड्स प्रायव्हेट लिमिटेड' चा प्रकल्प असून, जगभरात मराठी खाद्यपदार्थांची गुणवत्तापूर्ण उपहारगृहे उभारणे व मराठी खाद्यसंस्कृती सर्वदूर पोहोचविणे हे त्यांचे संकल्पित कार्य आहे.**

संजीव वेलणकर पुणे

जयंती कठाळे या मूळच्या नागपूरच्या. आयटी क्षेत्रात गलेलठ्ठ पगाराची नोकरी करणाऱ्या जयंती नोकरीनिमित्त देशोदेशी प्रवास करत होत्या. काही वर्षांपूर्वी नोकरीनिमित्ताने त्या संपूर्ण परिवारासोबत बंगळुरूमध्ये स्थायिक झाल्या. देशोदेशी फिरताना त्यांनी अनेक वेगवेगळ्या पदार्थांची चव चाखली. मात्र, कायमस्वरूपी बंगळुरूसारख्या अमराठी शहरात स्थायिक झाल्यावर त्या मराठमोळ्या पदार्थांच्या आठवणीने व्याकुळ होत असत. एकदा तर पती व तीन महिन्यांच्या बाळाला घेऊन २७ तासांचा विमान प्रवास करत असताना त्यांना शाकाहारी जेवणाअभावी ब्रेड-बटर खावा लागला. या प्रसंगानंतर त्यांना खाद्यक्षेत्र व्यवसायात उतरावे, असे प्रकर्षाने वाटू लागले. मराठमोळ्या कुटुंबात जन्मलेल्या जयंती यांच्या स्वयंपाकाला अगदी पारंपरिक चव होती. एकत्र कुटुंबात वावरलेल्या जयंती यांनी आजीच्या हाताखाली स्वयंपाकघरातल्या सगळ्या कला उत्तम शिकून घेतल्या होत्या. मराठमोळे पदार्थ बनवून खाण्याची आणि खाऊ घालण्याची आवड त्यांना होती. आपल्या याच कौशल्याचा उपयोग करण्याचे त्यांनी ठरवले. जयंती यांनी आपली नोकरी सांभाळून उत्सवाप्रसंगी पुरणपोळी आणि मोदक तयार करून विकण्यास सुरुवात केली. तेव्हा 'ऑर्कुट' या सोशल माध्यमाचा त्यांनी यासाठी पुरेपूर वापर करून घेतला. लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने, स्वतःचा व्यवसाय करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. २०१२-१३ मध्ये त्यांनी 'पूर्णब्रह्म' नावाचे स्वतःचे मराठमोळे उपाहारगृह बंगळुरुमध्ये सुरू केले. 'पूर्णब्रह्म'ची स्थापना करण्यापूर्वी जयंती यांनी सहा महिने बंगळुरुमधील छोट्या-मोठ्या प्रत्येक उपाहारगृहात जाऊन तेथील परिस्थितीचा, पदार्थांचा, सेवेचा, दरांचा, गुणवत्तेचा बारकाईने अभ्यास केला. पदार्थांची गरज लक्षात घेतली. महाराष्ट्रातल्या मुख्य शहरांत जाऊन तिथल्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची चव चाखली. आपल्याला ग्राहकांना वेगळे काय देता येईल? अमराठी माणसाला मराठी पदार्थांकडे कसे आकर्षित करता येईल? इत्यादी गोष्टींचा अभ्यास केला. मित्रपरिवाराचा सल्ला घेतला आणि 'पूर्णब्रह्म'ची निर्मिती झाली. आयटी क्षेत्रातील नोकरी सोडून सुरुवातीला दोन सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी छोटेसे रेस्टॉरंट सुरू केले. लोकांचा प्रतिसाद वाढू लागला, तशी जागेची उणीव भासू लागली. काही काळातच त्यांनी बंगळुरुमधील 'एचएसआर लेआऊट' या उच्चभ्रू वस्तीमध्ये ५,७०० चौरस फूट जागेत 'पूर्णब्रह्म'चे आलिशान उपाहारगृह थाटले. ते आता बंगळुरूमधील मराठी पदार्थ खाऊ घालणारे उत्तम दर्जाचे उपाहारगृह म्हणून ओळखले जाते. या मराठमोळ्या पदार्थांचा आस्वाद आपण महाराष्ट्रात राहून घेत आहोत, असा ग्राहकाला 'फील' यावा, या दृष्टीने 'पूर्णब्रह्म' उपाहारगृहात वातावरणनिर्मिती केली आहे. आयटी क्षेत्रातील नोकरीमुळे कधीकाळी स्कर्ट, पॅन्ट-शर्टमध्ये वावरणाऱ्या जयंती या आपल्या हॉटेल्समध्ये चक्क नऊवारी साडीत वावरतात. एकावेळी २०० जणांची पंगत बसू शकेल, अशी चौरंग-पाटाची भारतीय बैठक तिथे मांडण्यात आली आहे. परदेशातील मराठी माणसाला आपल्या देशाची कमी भासू नये म्हणून त्याला अगदी गरमागरम तूप, भात आणि मेतकूट मिळावे, यासाठी त्या अक्षरशः दिवस-रात्र एक करत आहेत. गर्भवती स्त्रियांना आपल्या हॉटेलमध्ये आल्यावर खुर्चीत बसण्यास आराम वाटावा, यासाठी विशेष खुर्च्या तयार करण्यात आल्या. इतकेच नाही तर परदेशात सहज मिळू शकत नाहीत, असे अळिवाचे लाडूही याठिकाणी मिळतात. 'पूर्णब्रह्म'चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, इथे महिला सबलीकरणाच्या दृष्टीने महिलांना प्राधान्य दिले जाते. कर्मचाऱ्यांपैकी ५० टक्के महिला आहेत. इतर क्षेत्रांप्रमाणे पगाराच्या बाबतीत स्त्री-पुरुष यांच्या पगारात भेदभाव केला जात नाही. भविष्यात पाच हजार शाखा उघडत आपल्या व्यवसायाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्याचा विचार करणाऱ्या जयंती यांचा 'फ्रँचायझी' देतानाही महिलांना प्राधान्य देण्याकडे कल असतो. जयंती आयटी क्षेत्रात असल्याने त्यांच्या आदर्श म्हणजे 'इन्फोसिस'च्या संस्थापिका सुधा मूर्ती! त्यांनी जयंती यांच्या आग्रहाखातर 'पूर्णब्रह्म'ला भेट दिली. त्यांनाही हा उपक्रम आवडला. पुण्यात आणि बंगळुरू येथील 'इन्फोसिस'मध्ये 'पूर्णब्रह्म'च्या शाखा सुरू करण्यासही त्यांनी परवानगी दिली. मुंबईत अंधेरी येथेही 'पूर्णब्रह्म'ची शाखा सुरू झाली आहे. भारताबाहेर फिलाडेल्फिया आणि शिकागो येथेही 'पूर्णब्रह्म'च्या शाखा आहेत. तसेच मुंबई-दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावरही शाखा सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. 'मोठे स्वप्न बघा. ते पूर्ण करण्यासाठी धडपड करा. वाटेत ठेच लागून खाली पडाल, तरीही उठून पुन्हा मार्गक्रमण करा. पुन्हा सर्व ताकदीनिशी उठा, सर्व प्रयत्न पणाला लावा. यश नक्की तुमचेच होईल' हा मूलमंत्र अनेक यशस्वी व्यावसायिक आणि उद्योजक देतात आणि स्वतःही त्याचे पालन करतात. असेच एक मोठे स्वप्न उराशी बाळगून मराठमोळ्या जयंती कठाळे या आज एक यशस्वी महिला उद्योजिका बनल्या आहेत.



# बेस्ट निवडणुकीत ठाकरे बंधू विरुद्ध महायुतीचे एकत्र पॅनल

■ मुंबई

दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटीची पंचवार्षिक निवडणूक १८ ऑगस्ट रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे बंधूंनी एकत्र येत पॅनल तयार केले. दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन लढवलेली ही पहिलीच निवडणूक आहे. या निवडणुकीत ठाकरे बंधूंना आव्हान देण्यासाठी महायुतीनेही मोर्चेबांधणी केली असून एकत्र येत सहकार समृद्धी पॅनलची निर्मिती केली आहे. या पॅनलमध्ये भाजपा आमदार प्रवीण दरेकर व प्रसाद लाड यांची श्रमिक उत्कर्ष सभा, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांची समर्थ बेस्ट कामगार संघटना, शिंदे गटाचे किरण पावसकर यांची राष्ट्रीय कर्मचारी सेना, महेंद्र साळवे यांची बेस्ट एसी/एसटी/व्हीजेएनटी वेल्फेअर असोसिएशन आणि मनोज संसारे यांचा बहुजन संघ अशा पाच संघटनांचा समावेश आहे. या पाचही संघटनांनी सोसायटीत सत्ताधारी उबाठा सेनेच्या संचालक मंडळाच्या भ्रष्ट कारभाराविरोधात लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. समर्थ बेस्ट कामगार सेनेचे विलास पवार म्हणाले की, सुमारे ८४ वर्षांचा इतिहास असलेल्या या पतसंस्थेवर उबाठा सेनेचे मंडळ गेली ९ वर्षे कार्यरत होते. या काळात झालेल्या भ्रष्ट कारभारामुळे अनेक सभासदांनी राजीनामे दिले. परिणामी सभासद संख्या निम्म्यावर आली. तसेच अ श्रेणी असलेली सोसायटी मागील ४ वर्षांपासून ब श्रेणीत घसरली आहे.

# भिंगारा घाटात ट्रक दरीत कोसळला! दोघांचा मृत्यू

■ बुलडाणा

बुलडाण्याच्या नांदुरा-बुऱ्हाणपूर मार्गावरील भिंगारा घाटात आज एक ट्रक ३०० फूट खोल दरीत कोसळला. या दुर्घटनेत ट्रकमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला. घटना अतिशय दुर्गम आणि चिंचोळ्या घाटरस्त्यावर घडल्याने मदतकार्यात अडथळे आले. अपघाताची माहिती मिळताच जळगाव जामोद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस व स्थानिक नागरिकांनी मृतदेह दरीतून बाहेर काढले. या घाटातून जड वाहनांना प्रवेश बंदी आहे. तरीही या मार्गावरून अशा वाहनांची वाहतूक सुरू असल्यामुळे आज हा अपघातात झाला. या घटनेनंतर स्थानिकांनी वाहतूक सुरक्षेबाबत प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, अवजड वाहनांवर बंदी घालण्याची मागणी केली.

## आजचे राशी भविष्य

सोमवार दि. ११ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | दुपारनंतर अचानक प्रवास घडू शकतो. आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता. विवाहास उत्सुक मंडळींना विवाहाचे प्रस्ताव येतील. |
| वृषभ | नवीन प्रकल्प करण्यासाठी वेळ द्याल. जोडीदारामार्फत आर्थिक लाभ प्राप्त होतील. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| मिथुन | दुपारनंतर धार्मिक स्थळी भेट देण्याचा योग येईल. कुटुंबियांसाठी अधिक खर्च कराल. कामामध्ये अधिक परिश्रम घ्यावे लागतील. |
| कर्क | दुपारनंतर काहींना अचानक धनलाभ होऊ शकतो. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक. वडिलधाऱ्यांशी वाद टाळा. |
| सिंह | तुमच्या महत्त्वाकांक्षा जिद्दीने पूर्ण कराल. सामाजिक क्षेत्रात नावलौकिक वाढेल. जोडीदाराबरोबर गैरसमज होऊ देऊ नका. |
| कन्या | नोकरीमध्ये सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. व्यावसायिक स्थिती चांगली राहील. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. |
| तूळ | व्यवसायामध्ये नवीन बदल फायदेशीर ठरू शकतो. नोकरीमध्ये कामाचा ताण जाणवेल. प्रिय व्यक्तींशी वाद टाळा. |
| वृश्चिक | आर्थिक लाभाचे प्रमाण थोडे कमी राहील. कौटुंबिक नात्यात गैरसमज होणार नाही याची काळजी घ्या. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक. |
| धनु | कार्यक्षेत्रात धाडसी निर्णय यशस्वी होतील. काहींना छोटा प्रवास घडू शकतो. जुने पैसे वसूल होण्याची शक्यता आहे. |
| मकर | नोकरीनिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. आर्थिक व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी. प्रवासात वस्तू गहाळ होणार नाहीत याची काळजी घ्या. |
| कुंभ | व्यवसायानिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. उत्साह जाणवेल. चैनीच्या वस्तू खरेदी कराल. |
| मीन | दुपारनंतर कामानिमित्त प्रवास घडू शकतो. घरामध्ये धार्मिक वातावरण राहील. नोकरीमध्ये अधिकारप्राप्तीचे योग येतील. |


निकाल महाराष्ट्र राज्य लॉटरी **महाराष्ट्र गजलक्ष्मी** रवि विकली लॉटरी सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 10/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- **GL-02 : 4893**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0115 | 1096 | 1581 | 2960 | 3432 | 3855 | 4004 | 6312 | 7192 | 8280 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1492 | 2433 | 4133 | 5558 | 5723 | 5737 | 6521 | 7808 | 8050 | 8263 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 3339 | 3808 | 5091 | 5922 | 6519 | 6688 | 6770 | 7704 | 8208 | 8834 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 300/- | 0608 | 1166 | 2442 | 3331 | 4343 | 5348 | 6056 | 7025 | 7947 | 8785 |
| 0000 | 0615 | 1234 | 2478 | 3366 | 4404 | 5354 | 6086 | 7204 | 7977 | 8806 |
| 0014 | 0650 | 1299 | 2492 | 3393 | 4409 | 5357 | 6108 | 7227 | 7994 | 8867 |
| 0044 | 0702 | 1351 | 2551 | 3426 | 4434 | 5405 | 6116 | 7246 | 8038 | 8893 |
| 0052 | 0714 | 1511 | 2554 | 3435 | 4437 | 5426 | 6159 | 7292 | 8058 | 8998 |
| 0095 | 0789 | 1612 | 2569 | 3502 | 4457 | 5435 | 6164 | 7340 | 8104 | 9067 |
| 0230 | 0800 | 1641 | 2672 | 3509 | 4459 | 5474 | 6286 | 7372 | 8198 | 9076 |
| 0242 | 0814 | 1654 | 2744 | 3583 | 4475 | 5541 | 6299 | 7378 | 8228 | 9270 |
| 0261 | 0888 | 1736 | 2821 | 3633 | 4634 | 5558 | 6374 | 7473 | 8233 | 9314 |
| 0289 | 0906 | 1925 | 2829 | 3673 | 4646 | 5574 | 6381 | 7477 | 8265 | 9342 |
| 0305 | 1010 | 2032 | 2852 | 3693 | 4669 | 5591 | 6391 | 7627 | 8305 | 9361 |
| 0352 | 1024 | 2060 | 2857 | 3830 | 4785 | 5610 | 6501 | 7643 | 8332 | 9478 |
| 0426 | 1025 | 2129 | 2946 | 3843 | 4792 | 5656 | 6566 | 7664 | 8383 | 9636 |
| 0480 | 1033 | 2138 | 3013 | 4015 | 4864 | 5679 | 6601 | 7757 | 8401 | 9726 |
| 0504 | 1039 | 2200 | 3062 | 4084 | 4892 | 5710 | 6612 | 7769 | 8422 | 9829 |
| 0507 | 1066 | 2203 | 3134 | 4107 | 4898 | 5770 | 6732 | 7772 | 8458 | 9918 |
| 0518 | 1100 | 2249 | 3153 | 4141 | 4973 | 5795 | 6763 | 7797 | 8584 | 9937 |
| 0525 | 1113 | 2272 | 3163 | 4145 | 5005 | 5969 | 6789 | 7821 | 8630 | 9959 |
| 0527 | 1116 | 2312 | 3173 | 4225 | 5065 | 5971 | 6846 | 7837 | 8688 | 9963 |
| 0541 | 1131 | 2327 | 3208 | 4245 | 5114 | 5995 | 6887 | 7881 | 8689 | 9980 |
| 0567 | 1150 | 2362 | 3301 | 4310 | 5333 | 6036 | 6960 | 7928 | 8764 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


# प्रवाशाला अस्वच्छ सीट दिली इंडिगोला १.५ लाखांचा दंड

■ नवी दिल्ली

प्रवाशाला अस्वच्छ आणि डाग असलेली सीट दिल्याप्रकरणी दिल्ली ग्राहक तक्रार निवारण आयोगाने इंडिगो एअरलाईन्सला १.५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसेच २५००० रुपये खटल्याचा खर्च देण्याचे आदेश दिले आहेत.

पिंकी नावाच्या महिला प्रवाशाने तक्रार केली होती की, २ जानेवारी २०२५ रोजी बाकू (अझरबैजान) -दिल्ली प्रवासादरम्यान त्यांना दिलेली जागा घाणेरडी आणि डाग पडलेली होती. तक्रार केल्यानंतरही त्यांना एअरलाईन्सकडून असंवेदनशील वागणूक मिळाल्याचा आरोप त्यांनी केला.

इंडिगोने बचाव करताना म्हटले की, तक्रार लक्षात घेऊन प्रवाशाला दुसरी जागा देण्यात आली होती आणि त्यांनी समाधानाने प्रवास पूर्ण केला. मात्र, आयोगाने इंडिगोला सेवेच्या बाबतीत दोषी ठरवले. प्रवाशाला शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागल्याचेही नमूद केले.

# भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था

■ बंगळुरू

**मोदींचे वक्तव्य**

**भारत** ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले. त्यांनी बंगळुरूमधील केएसआर रेल्वे स्थानकावरून तीन वंदे भारत एक्स्प्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यामध्ये बंगळुरू-बेळगाव, अमृतसर-श्री माता वैष्णोदेवी कटरा आणि नागपूर (अजनी)-पुणे या गाड्यांचा समावेश आहे. पंतप्रधानांनी बंगळुरू आणि राज्यासाठी अनेक विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणीही केली. या प्रकल्पांचा एकूण खर्च २२ हजार कोटी रुपयांहून अधिक आहे. तसेच, बंगळुरू मेट्रोच्या यलो लाईनचेही त्यांनी उद्घाटन केले. ही मेट्रो आरव्ही रोड (रागीगुड्डा) ते बोम्मासंद्रापर्यंत धावणार आहे. यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले की, आज संपूर्ण जगात भारत ही सर्वात वेगाने पुढे जाणारी अर्थव्यवस्था आहे आणि गेल्या ११ वर्षांत प्रचंड बदल घडून आले आहेत. ११ वर्षांपूर्वी आपली अर्थव्यवस्था जगात १० व्या क्रमांकावर होती, पण आता आपण पाचव्या स्थानावर पोहोचलो आहोत. आपण अतिशय वेगाने जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करत आहोत.

## शुभ राशी दि. ११/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ७ | ० | ५ |
| ७१ | ०४ | ५४ |
| ७६ | ०९ | ५९ |
| १२४ | १३९ | ३४८ |
| ३६८ | २८० | ४५६ |


निकाल महाराष्ट्र राज्य लॉटरी **महाराष्ट्र मोहिनी** विकली लॉटरी सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 10/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **MO-09 : 2768**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1276 | 1532 | 2528 | 2967 | 3164 | 3866 | 4519 | 5063 | 5233 | 5347 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 2794 | 2843 | 3225 | 3373 | 3412 | 4285 | 5118 | 5328 | 5708 | 5835 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1110 | 2224 | 2786 | 4126 | 5251 |
| 1311 | 2250 | 2827 | 4168 | 5487 |
| 1414 | 2251 | 2866 | 4374 | 5509 |
| 1422 | 2266 | 3000 | 4413 | 5545 |
| 1540 | 2286 | 3077 | 4447 | 5658 |
| 1596 | 2303 | 3107 | 4454 | 5719 |
| 1627 | 2483 | 3276 | 4484 | 5795 |
| 1706 | 2570 | 3526 | 4632 | 5853 |
| 1792 | 2727 | 3548 | 4641 | 5874 |
| 1968 | 2728 | 3760 | 4684 | 5885 |
| 2009 | 2762 | 3787 | 5200 | 5908 |
| 2149 | 2772 | 4125 | 5229 | 5982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

निकाल महाराष्ट्र राज्य लॉटरी **गणेशलक्ष्मी वैभव** विकली लॉटरी सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 10/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **MG-02 : 8983**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1812 महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर | 2653 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 3867 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 7788 | 9237 |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0201 | 0428 | 2392 | 3491 | 4132 | 4225 | 5046 | 5355 | 5825 | 9095 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0022 | 0223 | 0278 | 1430 | 1816 | 3118 | 4556 | 8216 | 9268 | 9611 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0000 | 0854 | 1861 | 3231 | 4003 | 5016 | 6084 | 7407 | 8627 | 9394 |
| 0042 | 0906 | 1875 | 3263 | 4074 | 5205 | 6281 | 7476 | 8658 | 9444 |
| 0049 | 1013 | 2029 | 3311 | 4124 | 5227 | 6303 | 7577 | 8788 | 9483 |
| 0080 | 1136 | 2071 | 3379 | 4148 | 5243 | 6381 | 7701 | 8789 | 9575 |
| 0096 | 1157 | 2085 | 3401 | 4191 | 5295 | 6419 | 7705 | 8830 | 9773 |
| 0195 | 1163 | 2255 | 3474 | 4240 | 5315 | 6545 | 7879 | 8837 | 9790 |
| 0230 | 1184 | 2272 | 3501 | 4288 | 5404 | 6618 | 7936 | 8849 | 9797 |
| 0287 | 1314 | 2322 | 3630 | 4403 | 5425 | 6780 | 7997 | 8850 | 9894 |
| 0300 | 1317 | 2334 | 3780 | 4426 | 5579 | 6816 | 8098 | 9040 | 9899 |
| 0305 | 1431 | 2358 | 3793 | 4454 | 5625 | 6988 | 8183 | 9096 | 9922 |
| 0458 | 1590 | 2400 | 3827 | 4466 | 5763 | 7094 | 8328 | 9118 | 9966 |
| 0570 | 1594 | 2780 | 3890 | 4680 | 5769 | 7111 | 8380 | 9162 | 9967 |
| 0610 | 1701 | 2872 | 3959 | 4781 | 5914 | 7224 | 8588 | 9192 | 9969 |
| 0803 | 1768 | 2968 | 3973 | 4904 | 6056 | 7402 | 8599 | 9384 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गोव्यात राखी बांधण्यावरून पोलिसांकडून शाळेची चौकशी

■ पणजी

**गोव्यात** विद्यार्थ्यांनी हातात राखी किंवा दोरा बांधण्यावरून नवा वाद सुरू झाला आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांनी एका आठवड्यानंतर राखी काढून टाकण्याची सूचना दिली होती. या वादात बजरंग दलाने उडी घेतल्यामुळे पोलिसांनी शाळेची चौकशी सुरू केली आहे.

गोव्यातील कुनकोलीम शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना केवळ एक आठवडाभर राखी बांधण्याची सूचना केली होती. त्यावर एका विद्यार्थ्याच्या पालकांनी चौकशी करण्याची मागणी केली. या वादात बजरंग दलानेही शाळेच्या मुख्याध्यापकांना अशा सूचना का दिल्या असा जाब विचारला. बजरंग दलाने या विषयावर मुख्यमंत्र्यांनीही आपली भूमिका स्पष्ट करण्याचे आवाहन केले. कुणकोलीम पोलिसांनी आता या प्रकरणाच्या चौकशीला सुरुवात केली आहे.

## सीबीएसई नववीची परीक्षा आता ओपन बुक पद्धतीने




■ नवी दिल्ली

**केंद्रीय** माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) नववीच्या परीक्षा आता ओपन बुक पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा ताण कमी करून विषयांचे सखोल आकलन वाढवणे हा या निर्णयामागचा उद्देश आहे. त्यामुळे आता नववीचे विद्यार्थी पुस्तके आणि नोंदी समोर ठेवून परीक्षा देऊ शकणार आहेत. ओपन बुक असेसमेंट पद्धतीत परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना त्यांच्या पाठ्यपुस्तकांसह, नोट आणि लायब्ररीतील संदर्भग्रंथ वापरण्याची परवानगी मिळते. यामुळे केवळ माहिती तोंडपाठ करून लिहिण्यापेक्षा संकल्पना समजून घेणे, त्यांचे विश्लेषण करणे आणि योग्य वापर करणे यावर भर दिला जातो. डिसेंबर २०२३ मध्ये सीबीएसईने इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ओपन बुक परीक्षेचा एक प्रायोगिक अभ्यास (पायलट स्टडी) केला होता. त्यानंतर शिक्षकांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला. काही आव्हाने असूनही, या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी कौशल्ये विकसित करेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## लंडनच्या वेस्टमिन्स्टरमध्ये आंदोलक-पोलिसांत झटापट

■ लंडन



**ब्रिटनच्या** सरकारने पॅलेस्टाईन ॲक्शन गटावर बंदी घातल्यानंतर लंडनच्या वेस्टमिन्स्टरमध्ये सुरू झालेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी २०० आंदोलकांना अटक केल्यामुळे एकच गोंधळ उडाला. मात्र या आंदोलनावर नियंत्रण मिळवताना आंदोलकांसोबत जोरदार झटापट झाल्याने पोलिसांची चांगली दमछाक झाली.

वेस्टमिन्स्टरच्या पार्लमेंट स्क्वेअरमध्ये जेव्हा निदर्शने सुरू झाली तेव्हा ५०० ते ६०० आंदोलक एकत्र आली होती. त्यावेळी त्यांनी फलक घेऊन सरकारविरोधात जोरदार घोषणा दिल्या. पोलिसांनी अटकेची कारवाई सुरू करताच आंदोलक आक्रमक झाले.

### २०० जणांना अटक

पोलीस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाल्यामुळे प्रचंड गोंधळ उडाला. त्यात पोलिसांनी २०० आंदोलकांना गाडी भरून पोलीस ठाण्यात नेली आणि त्यांच्यावर अटकेची कारवाई केली. सरकारने जुलैमध्ये दहशतवाद कायद्यांतर्गत या गटावर बंदी घातली होती, या गटाचे समर्थन करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश होते. या गुन्ह्यात तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली जाऊ शकते.

देश विदेश

## उत्तरकाशीत ५ लाखांची घोषणा! ५,००० दिले ! नागरिकांचा संताप

■ डेहराडून

**उत्तरकाशीत** ढगफुटीमुळे आलेल्या प्रलयानंतर प्रचंड नुकसान झाले होते. यावेळी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी पूरग्रस्तांना पाच लाखांची मदत जाहीर केली होती. प्रत्यक्षात मात्र त्यांना केवळ ५ हजारच दिले. पूरग्रस्तांनी सरकारचा निषेध करत हे चेक परत दिले आहेत. झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात ही मदत म्हणजे थट्टा असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

उत्तरकाशीत ५ ऑगस्ट रोजी ढगफुटी झाली. त्यामध्ये धराली, हर्षल व उत्तरकाशीत मोठे नुकसान झाले. या गावातील ज्यांची घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झालेली आहेत किंवा ज्यांच्या घरातील व्यक्ती मृत झाली त्यांना मुख्यमंत्र्यांनी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली. प्रत्यक्षात मात्र त्यांच्या हातावर केवळ ५ हजार रुपयांचे चेक दिले.

लोकांनी नाराजी व्यक्त करत ते घेण्यास नकार दिला. त्यावर आता प्रशासनाने म्हटले की, ही केवळ अंतरिम मदत असून नुकसानीचे पंचनामे झाल्यानंतर संपूर्ण रक्कम देण्यात येईल. उत्तरकाशी भागात आज पाचव्या दिवशीही मदतकार्य सुरुच ठेवण्यात आले. काही भागात हेलिकॉप्टरद्वारे अन्नाची पाकिटे टाकण्यात आली. तर काहींना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. धराली बाजार भागातील ढिगाऱ्यांमध्ये अडकलेल्यांचा शोध घेतला जात आहे. या भागात अनेक हॉटेल, वसतीगृहे, दुकाने व होमस्टे जमीनदोस्त झालेले आहेत. या ढगफुटीमुळे ५ जणांचा मृत्यू झाला असून, ४९ जण बेपत्ता झाले आहेत. आतापर्यंत एक हजार लोकांना वाचवण्यात यश आले आहे.

## कंबोडियाजवळील भूसुरुंगात ३ थायलंडचे सैनिक जखमी

■ बँकॉक

**कंबोडियाजवळील** सीमावर्ती भागात गस्त घालत असताना भूसुरुंगात ३ थायलंडचे सैनिक जखमी झाले. सीमेवर आतापर्यंत भूसुरूंगांमुळे थायलंड सैनिक जखमी होण्याची ही तिसरी घटना आहे. थायलंडच्या सिसाकेट आणि कंबोडियाच्या प्रेह विहार प्रांतामधील एका भागात गस्त घालत असताना थायलंडच्या एका सैनिकाने भूसुरुंगावर पाय ठेवल्याने त्याच्या पायाला गंभीर इजा झाली आणि इतर दोघे जखमी झाले. भूसुरुंगांच्या वापरावर बंदी घालणाऱ्या कराराचे उल्लंघन केल्याबद्दल कंबोडियाविरुद्ध तक्रार दाखल केली जाईल, असे थायलंडच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले. थायलंड आणि कंबोडिया हे दोन्ही देश भूसुरुंगांविरुद्धच्या ओटावा करारावर स्वाक्षरी करणार आहेत. कंबोडियाच्या संरक्षण मंत्रालयाने या स्फोटाबाबत कंबोडियन फ्रंटलाईन फोर्सेकडून अद्याप स्पष्टीकरण दिले नाही. मात्र युद्धबंदीचे काटेकोरपणे पालन करत असल्याचे पुन्हा सांगितले.

## गिलगिट-बाल्टिस्तानसाठी सौर ऊर्जा प्रकल्पाला मंजुरी

■ इस्लामाबाद

**गिलगिट** आणि बाल्टिस्तानसाठी राष्ट्रीय आर्थिक परिषदेच्या कार्यकारी समितीने १०० मेगावॅटच्या सौर ऊर्जा प्रकल्पाला मान्यता दिली. त्यामुळे प्रकल्पाचे औपचारिक काम आता सुरू होणार आहे. पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी गिलगिटच्या दौऱ्यात घोषणा केली होती की, लवकरच १०० मेगावॅट क्षमतेच्या वीज प्रकल्पांना मान्यता देण्यात येईल.

या प्रकल्पाचा फायदा अस्टोर, दारेल, टांगीर, डायमर, घांचे, घिझर, गिलगिट, हुनझा, इश्कोमन, राउंडू, स्कार्दू आणि शिगर या जिल्ह्यांना होईल. पहिल्या टप्प्यात स्कार्दू जिल्ह्याला १८.९६ मेगावॅट वीज पुरवली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात हुंझा, गिलगिट आणि डायमर जिल्ह्यांना अनुक्रमे ६ मेगावॅट, २८ मेगावॅट आणि १३ मेगावॅट वीज पुरवली जाईल आणि उर्वरित जिल्ह्यांना तिसऱ्या टप्प्यात १६.१ मेगावॅट वीज मिळणार आहे.



गणरायाचा जयघोष करत गणेशभक्तांनी कार्यशाळेतून डोंगरीच्या राजाची भव्य मूर्ती मंडपास्थळी नेली.

## शक्तिपीठ महामार्गाविरोधात १५ ऑगस्टला अभिनव आंदोलन

■ कोल्हापूर

**शक्तीपीठ** महामार्गाविरोधात शुक्रवार, १५ ऑगस्टला अभिनव आंदोलन करण्यात येणार आहे. ज्या शेतातून शक्तिपीठ महामार्ग जाणार आहे, त्या शेतात तिरंगा झेंडा लावून शक्तिपीठ महामार्ग आम्हाला नकोच, असा संदेश दिला जाणार आहे. हे आंदोलन तब्बल १२ जिल्ह्यांमध्ये केले जाणार आहे.

शक्तिपीठ महामार्ग विरोधात काल शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीची बैठक पार पडली. शक्तिपीठ विरोधातील बारा जिल्ह्यांमधील लोकप्रतिनिधी, त्याचबरोबर शेतकरी या बैठकीसाठी ऑनलाइन सहभागी झाले. शक्तिपीठ नको, आमच्या वावरात या घोषवाक्यासह स्वातंत्र्यदिनी शेतातच मेळावे घेण्याचाही निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

आमदार सतेज पाटील म्हणाले की, सरकार हा महामार्ग रेटण्याचा प्रयत्न करत असले तरी आम्ही तो होऊ देणार नाही. त्याऐवजी राज्यात ज्या ठिकाणी रस्ते नाहीत, तिथे रस्ते बांधा, शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या.

८६ हजार कोटींचा शक्तिपीठ महामार्ग आता १ लाख ६ हजार कोटींवर पोहोचला आहे. स्वातंत्र्यदिनी शेतात तिरंगा लावून सरकारला ठणकावून सांगू की, हा महामार्ग आम्हाला नको.




लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांना आदर्श मानून जनसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या छत्रपती संभाजी नगरच्या संजय मधुकर मुळे यांना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दीक्षा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वासराव तरटे, मानवतावादी चळवळीच्या प्रमुख अंतिमा कोल्हापूरकर इतर पुरस्कार प्राप्त मान्यवर उपस्थित होते.

## डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करा ! राहुल गांधींची मागणी

■ नवी दिल्ली

**विरोधी** पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांमध्ये घोळ केल्याचे पत्रकार परिषदेत दाखवून दिल्यानंतर आता या मतदान याद्या डिजिटल स्वरुपात सार्वजनिक करण्याची मागणी आयोगाकडे केली आहे. निवडणुकीतील गैरप्रकार रोखण्यासाठी काँग्रेसने सर्वसामान्य मतदारांसाठी एक वेब पोर्टलही तयार केले आहे.आपल्या एक्स खात्यावरील संदेशात राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी अद्ययावत मतदार यादी आवश्यक आहे. आयोगाकडे आमची मागणी आहे की, त्यांनी पारदर्शकता दाखवावी व डिजिटल मतदार याद्या सार्वजनिक कराव्यात. जेणेकरुन जनता स्वतःच या याद्यांची सत्यता पडताळून पाहू शकेल. यासाठी जनतेने आमच्याबरोबर यावे. यासाठी तयार करण्यात आलेल्या पोर्टलवर नोंदणी करावी. यासाठी काँग्रेसने व्होटचोरी डॉट इन हे पोर्टल तयार केले आहे. मतदार ९६५०००३४२० या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊनही या मोहिमेत सहभागी होऊ शकतात.

## २०२१ पासून टेम्पोचालक बेपत्ता गोरक्षकांनी हत्या केल्याचा संशय

### पत्नीची हायकोर्टात याचिका दाखल

■ मुंबई

२०२१ पासून बेपत्ता असलेल्या एका टेम्पोचालकाचे पुणे जिल्ह्यातील स्वयंघोषित गोरक्षकांनी अपहरण करून त्याची हत्या केली असल्याचा संशय या टेम्पोचालकाच्या पत्नीने व्यक्त केला आहे. तसेच आपल्या पतीच्या शोधासाठी तिने थेट उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

बेपत्ता टेम्पो चालकाचे नाव रफिक मेहबूब तांबोळी (३५) आहे. त्याची पत्नी रेश्मा हिने आपल्या पतीला मारहाण आणि अपहरण करून त्याची हत्या केली असल्याचा संशय व्यक्त करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली आहे. न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने या याचिकेची गंभीर दखल घेत पोलिसांना आपली भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच पोलिसांनी अद्याप या प्रकरणात ठोस कारवाई का केली नाही? गुन्हा दाखल का केला नाही?असे सवाल खंडपीठाने केले. रेश्मा तांबोळी यांनी आपल्या याचिकेत म्हटले आहे की, ४ जून २०२१ रोजी माझे टेम्पोचालक पती रफिक यांना गोमांस वाहतूक करत असल्याच्या संशयावरून मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली.पुण्यातील इंदापूर परिसरात अखिल भारतीय जमातुल कुरेश समितीचे शिवशंकर स्वामी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही मारहाण केली होती. या घटनेच्या रात्रीपासून माझे पती बेपत्ता आहेत.

## रस्त्यासाठी विजयनगर ग्रामस्थांचे स्वातंत्र्यदिनी रेल रोको आंदोलन

■ सांगली

**तासगाव** तालुक्यातील विजयनगर आणि मोहननगर असे दोन भाग हे रेल्वे मार्गामुळे पडले आहेत. याच दोन भागांना जोडणारा रस्ता नसल्याने येथील नागरिकांची मोठी कुचंबणा होत आहे. त्यामुळे या दोन भागांना जोडणारा पर्यायी रस्ता उपलब्ध करून द्यावा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता विजयनगर रेल्वे स्टेशन येथे रेल रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला इशारा दिला आहे. विजयनगरच्या ग्रामस्थांनी सांगितले की, विजयनगर गावाची एकूण लोकसंख्या सुमारे ६४०० असून त्यातील २६०० लोक मोहननगर या वस्तीत राहतात.रेल्वे लाईनमुळे विजयनगर आणि मोहननगर हे दोन भाग वेगळे झाले आहेत. मोहननगर गाव मुख्य वस्तीपासून सुमारे अडीच किलोमीटर अंतरावर असून याठिकाणी स्मशानभूमी, दफनभूमी आदी सुविधा आहेत. गावातील नागरिकांना अंत्यविधीसाठी, तसेच अन्य कामांसाठी रेल्वे लाईन ओलांडूनच मोहननगरमध्ये जावे लागते. याउलट, ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, शाळा, दवाखाना, रेल्वे स्टेशन आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या सुविधा विजयनगर येथे आहेत.

## भारतीय विमानांचा पाकला वळसा पाकिस्तानचे १२४० कोटींचे नुकसान

■ नवी दिल्ली

**पहलगाम** येथे पर्यटकांवर पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर भारतीय विमानांनी पाकिस्तानची हवाई हद्द न वापरण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे पाकिस्तानचे गेल्या दोन महिन्यांत तब्बल १२४० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे. भारताची युरोप व अमेरिकेकडे दररोज किमान दीडशे विमाने जात असतात. ही विमाने ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानच्या हवाई हद्दीतून जात नसल्याने पाकिस्तानचे महिन्याला ६२० कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. पाकिस्तानच्या आघाडीचे वृत्तपत्र असलेल्या डॉनने ही माहिती दिली आहे.

## जुन्नर परिसरातील मादी बिबट्यांची होणार नसबंदी

### वनविभागाच्या मागणी प्रस्तावास केंद्राची मंजुरी

■ मुंबई

**पुणे** जिल्ह्यातील जुन्नर परिसरामध्ये बिबट्यांनी धुमाकूळ घातला असून मादी बिबट्यांची नसबंदी करावी, अशी अनेक दिवसांपासूनची मागणी होती. आता ही मागणी लवकरच पूर्ण होणार आहे. कारण राज्य सरकारच्या वनविभागाने केंद्र सरकारकडे मादीच्या नसबंदीसाठी प्रस्ताव पाठवला होता. या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे.

आता वन विभागाच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने दिलेली मंजुरी आणि केंद्राच्या मार्गदर्शक शिफारशीनुसार लवकरच अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. काही महिन्यांपूर्वी खासदार अमोल कोल्हे यांनीदेखील हीच मागणी केली होती. संसदेमध्येही त्यांनी हा विषय मांडला होता. त्यानंतर राज्याच्या वन्यजीव विभागाने ११ नर आणि ३६ मादी बिबट्यांवर गर्भनिरोधक उपाययोजना करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्रीय वन विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांकडे सादर केला होता. सध्या जुन्नर तालुक्यात ३०० बिबटे आहेत.जुन्नरसह आंबेगाव,मावळ आणि शिरूर या भागात बिबट्यांचा वावर वाढला आहे. केंद्राच्या मंजुरीनंतर आता वन्यजीव संस्थेच्या सहकार्याने नर आणि मादी बिबट्यांच्या ग्रंथींचा अभ्यास व गर्भनिरोधन यावर भर दिला जाईल.

## आज जोतिबा डोंगरावर निघणार नगर प्रदक्षिणा

■ कोल्हापूर

**पन्हाळा** तालुक्यातील जोतिबा डोंगराभोवती असणारी बारा ज्योतिर्लिंगे व अष्ट तीर्थ यांच्या दर्शनासाठी उद्या सोमवार ११ ऑगस्ट रोजी लाखो भाविकांच्या उपस्थितीत पारंपारिक नगर प्रदक्षिणा सोहळा पार पडणार आहे. दरवर्षी श्रावणातील तिसऱ्या सोमवारी नगर प्रदक्षिणा निघते.

या नगर प्रदक्षिणा सोहळ्यासाठी आज रविवारपासूनच भाविकांनी हजेरी लावली असून कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव, कोकणातून भाविक दाखल झाले आहेत. मंदिराचे पुजारी योगेश ठाकरे पुजारी यांनी सांगितले की,उद्या सोमवारी सकाळी नऊ वाजता चांगभलंचा जयघोष करून मुख्य मंदिरातून या सोहळ्याला सुरुवात होईल. हा सोहळा सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालणार आहे. वीणाधारी डवरी, भगवी पताका, टाळ मृदुंग आणि लाखों भाविकांच्या लवाजमासह नगर दिंडी निघेल. ४० किलोमीटरचे अंतर ९ तास अनवाणी जमीनीवर खाली न बसता अखंडपणे चालत ही नगर प्रदक्षिणा पूर्ण केली जाईल.लहानापासून ते वयोवृध्दापर्यंतचे पुरुष, महिला, भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असतात युवकांची संख्या लक्षणीय असते. नगर प्रदक्षिणा मार्गावर फराळाचे वाटपही मोठ्या प्रमाणात केले जाते. सोमवारी सकाळी ९ वाजता जोतिबा मंदिरात अभिषेक आरती करून नगरदिंडी गाय मुख मार्गे मार्गस्थ होईल.



## जामखेडमध्ये रक्षाबंधनाआधी विवाहितेची दोन मुलांसह विहिरीत आत्महत्या

■ अहिल्यानगर

**रक्षाबंधनाच्या** पूर्वसंध्येला एका विवाहितेने आपल्या दोन चिमुकल्यांसह घराजवळच्या विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. जामखेड तालुक्यातील नायगाव येथे ही हृदयद्रावक घटना घडली आहे.

आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव रुपाली नाना उगले (२५) तर दोन मुलांची नावे समर्थ (५)आणि मुलगी चिऊ (३) अशी आहेत. रुपाली आणि तिचे पती नाना उगले, मुलगा समर्थ आणि मुलगी चिऊ असे चार जणांचे कुटुंब नायगाव येथे राहत होते. शुक्रवारी सायंकाळी समर्थ शाळेतून घरी परतला. त्यानंतर रुपालीने समर्थ आणि लहान चिऊ यांना घराजवळील विहिरीकडे नेले आणि दोन्ही मुलांसह विहिरीत उडी घेऊन जीवन संपवले. संध्याकाळी नाना उगले आणि त्यांचे वडील शेतातून घरी परतले, तेव्हा घरात कोणीही नसल्याचे लक्षात आले. त्यांनी आजूबाजूला शोध घेतला असता विहिरीजवळ चपला दिसल्या. यानंतर ग्रामस्थांच्या मदतीने रात्री उशिरा विहिरीतून तीनही मृतदेह बाहेर काढण्यात आले. या आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. खर्डा पोलीस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहेत.

## देवेंद्र फडणवीस मराठा नेत्यांना संपविण्याच्या तयारीत आहेत

### मनोज जरांगे-पाटलांचा आरोप

■ अहिल्यानगर

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस हे मराठा नेत्यांना संपविण्याच्या तयारीत आहेत. आतापर्यंत मला ३२ आमदार व खासदारांचे फोन आले असून, भाजपामधील अनेक मराठा नेते आपल्याला त्रास दिला जात असल्याची तक्रार करत आहेत, असा गंभीर आरोप मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला.

मराठा आरक्षणासाठी २९ ऑगस्ट रोजी मुंबईत होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील हे राज्यभर दौरा करत असून आज ते अहिल्यानगर जिल्ह्यात दौऱ्यावर होते.

ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस मराठा नेते आणि अधिकाऱ्यांना संपवण्याच्या कामाला लागले आहेत. प्रत्येक मंत्र्यांना त्यांनी स्वतःचे विशेष कर्तव्य अधिकारी दिले आहेत. पूर्वी भाजपा पक्षाची दिशा वेगळी होती, परंतु सत्तेसाठी नारायण राणे, अजित पवार, राधाकृष्ण विखे, अशोक चव्हाण यांसारख्या अनेक नेत्यांना पक्षात घेतले. एवढेच नव्हे, तर भाजपामधीलच नेत्यांना संपवण्याचे काम सुरू आहे. सत्तेसाठी आपल्या लोकांनाही दूर सारण्याचे काम चालू आहे आणि माझ्याकडे त्याची यादी आहे.

## चक्क छातीत सुरा खुपसून लातुरात तरुणाची आत्महत्या

### पोलिसांना चिठ्ठी सापडली

■ लातूर

**गेल्या** काही वर्षांपासून मुंबईत राहत असलेल्या एका तरुणाने आपल्या निलंगा या मूळ गावी येऊन छातीत सुरा खूपसून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या तरुणाने आत्महत्येपूर्वी सोशल मीडियावर अकाऊंटवरून लाईव्ह येत आत्महत्येचे कारण सांगितले आहे.

आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव सुरज सागावे (३२) असून तो निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु. येथील रहिवासी आहे. सूरज हा गेल्या काही वर्षांपासून मुंबईत वास्तव्यस होता. मात्र काल सूरज आपल्या गावी आला आणि निलंगा शहरातील लांबोटकर पेट्रोल पंपाजवळ गेला. त्याठिकाणी सकाळी १२.३० वाजण्याच्या सुमारास एका झाडाखाली बसला आणि त्याने सोशल मीडियावर लाईव्ह करत आत्महत्या करत असल्याची माहिती दिली.यावेळी सूरजने आत्महत्या करण्यासाठी कारणीभूत असणाऱ्या लोकांना शिक्षा व्हावी,अशी मागणी केली आहे. त्याने आत्महत्यापूर्वी एक चिठ्ठी लिहिली आहे. लाईव्ह केल्यानंतर त्याने काही वेळाने छातीत सुरा खुपसला. सूरजचा अति रक्तस्त्राव होऊन जागीच मृत्यू झाला.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# दहिहंडी निधीची कोंडी

मुंबईकरांना जसे सहा महिने आधी गणेशोत्सवाचे वेध लागतात. त्याचप्रमाणे श्रावण महिना सुरू झाला की, दहीहंडी उत्सवाचेही वेध लागतात. मुंबईसाठी हा एक स्पेशल सण म्हणता येईल. संपूर्ण मुंबईभर गोकुळाष्टमीच्या दिवशी तरुणांमध्ये प्रचंड प्रमाणात उत्साह असतो. गोविंदा पथकांचे मनोरे पाहण्यासाठी सगळीकडे शहर आणि उपनगरामध्ये तुडुंब गर्दी होत असते. आज मुंबईमध्ये जवळपास तेरा हजार गोविंदा पथक आहेत आणि त्या सर्वांची किमान तीन-चार महिन्यांपासूनच मनोरे रचण्याच्या सरावाला प्रत्यक्ष सुरुवात होते. अलीकडच्या काळामध्ये या गोविंदा पथकांना अनेक सार्वजनिक संस्था किंवा मंडळाकडून विशेषत्वाने आमंत्रित केले जाते आणि त्यांच्यासाठी भरघोस बक्षिसांच्या रकमा जाहीर केल्या जातात. पण गेल्या वर्ष दोन वर्षांमध्ये मुंबईतल्या गोविंदा पथकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे. या अनपेक्षितपणे संख्या वाढत असल्याने ज्या मंडळाकडून या गोविंदा पथकांना आमंत्रण दिले जातात. त्यांच्यामध्ये आता स्पर्धा लागली आहे. स्वाभाविकपणे आपले गोविंदा पथक अधिक सरस असावे म्हणून त्यांच्याकडून घेतले जाणारे कष्ट, परिश्रम निश्चितच महत्त्वाचे ठरतात. अनेक महिने सातत्याने केले जाणारे त्यांचे सराव, त्यांच्या मधल्या धाडसाला, शौर्याला आणि जिद्दीला मोठे प्रोत्साहन देणारे असते आणि खरोखरच मुंबईच्या गोविंदा पथकांचे कौतुक करण्यासारखी गोष्ट असते की, जवळपास आठ-आठ, नऊ-नऊ थरांचे मनोरे उभारुन त्यांच्याकडून फोडली जाणारी दहीहंडी म्हणजे साहसाचा निश्चितच विलक्षण प्रकार असतो आणि म्हणूनच मुंबईतल्या अनेक सार्वजनिक मंडळाकडून या गोविंदा पथकांच्या या धाडसाचे कौतुक केले जाते आणि मोठमोठ्या रकमेची बक्षीसही दिली जातात. अनेक ठिकाणी तर २५-२५ लाखांचे बक्षीस दिली जातात. परंतु याचा दुसरा एक असा परिणाम होतो की, जी छोटी गोविंदा पथक असतात त्यांना यातून फारसा लाभ होत नाही. अर्थात त्यांचा प्रयत्न असतो की, आपणही त्याच स्पर्धेत असावे. परंतु मोठी गोविंदा पथक ही मोठी बक्षीस घेऊन जातात.

**सावसाला संरक्षण हवे**

दुसरा महत्त्वाचा भाग असा असतो की या गोविंदा पथकांचा प्रॅक्टिसचा किंवा अन्य खर्च काही सार्वजनिक संस्था करत असतात. त्यांच्याकडून त्यांना देणग्या मिळत असतात. शिवाय आपापल्या परिसरातले जे व्यापारी दुकानदार असतात अशा संस्था असतात त्यांच्याकडूनही या गोविंदा पथकांना वर्गणी मिळत असते. पण गेल्या काही वर्षांत गोविंदा पथकांची संख्या वाढल्याने वर्गणी मिळण्याचे प्रमाण कमी झालेले आहेत. म्हणजे जवळपास १३००० गोविंदा पथकांमधून अतिशय थोड्या गोविंदा पथकांना भरपूर रक्कम मिळते, पण बाकीच्या गोविंदा पथकांना आपल्या प्रॅक्टिसचा आणि गोविंदा पथकांचा इतर खर्च भागवण्यासाठी बरेच परिश्रम घ्यावे लागतात आणि म्हणूनच दहीहंडी आणि गोविंदा पथकांची निधीची कोंडी अशी आज परिस्थिती आहे. यातून मार्ग काढण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न होत असतो. म्हणजे भविष्य काळामध्ये गोविंदा पथकांची मोठ्या प्रमाणावर होणारी नोंदणी, त्यामध्ये सहभागी होणारे गोविंदा पथक यांची संख्या लक्षात घेतली तर सरकारने या गोविंदा पथकांच्या प्रोत्साहनसाठी आणखी विशेष काहीतरी योजना सुरू करणे गरजेचे ठरते. ज्यामध्ये त्यांच्या साहसाला उत्तम वाव मिळेल आणि त्याच वेळेला त्यांचे कौशल्य जपले जाऊ शकेल. सर्वात महत्त्वाचे गोविंदा पथकांना आपल्या गोविंदांची सुरक्षा जपण्याकरता त्यांना वैद्यकीय मदतीशिवाय त्यांचं विमा संरक्षण आणि इतर प्राथमिक उपचाराच्या सोयी सुद्धा उपलब्ध करून द्याव्या लागत असतात. बऱ्याच ठिकाणी गोविंदा पथकांना घालण्यासाठी टी-शर्ट आणि विजारी पुरवल्या जातात. त्यांचा खर्च मोठा असतो. शिवाय प्रॅक्टिसला येत असताना त्यांचा न्याहारीचा आणि काहीवेळा तर जेवणाचा खर्च काही लागत असतो आणि या सर्व खर्चाचा विचार केला तर गोविंदा पथकांना प्रॅक्टिससाठी किंवा त्यांच्या सरावासाठी पुरेशा निधीची आवश्यकता भासत असते.

**साहसाचा सन्मान व्हावा.**

हा निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वेगळ्या स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे ठरते. सरकारने जर या गोविंदा पथकांच्या दहीहंडी खेळाला साहस खेळाचा दर्जा दिला असेल तर इतर खेळांप्रमाणे या खेळालाही आवश्यक ते संरक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे. त्यामध्ये अनुदान देण्यापासून ते खेळाडूंची काळजी घेणे या तरतुदींचा समावेश होतो. एकाअर्थी हा साहसी खेळच म्हणता येतो आणि खेळातून घडून येणारे एक सांस्कृतिक मंथन खूप महत्त्वाचे ठरते. दहीहंडी हा मुंबईच्या समाज जीवनातला सांस्कृतिक मंथन घडवून आणणारा आणि तरुणांमधल्या उत्साहाला प्रचंड प्रोत्साहन देणारा प्रकार ठरतो. मात्र यामध्ये कुठल्याही गोविंदांचं नुकसान होणार नाही. त्यांच्या जीविताचे आणि त्यांच्या कौशल्याला कोणतेही गालबोट लागणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे ही काळजी त्या त्या गोविंदा पथकांनी तर घ्यावीच. परंतु जे लोक बक्षीस लावून उंचावर दहीहंडी टाकतात आणि लाखा-लाखाचे बक्षीस ठेवतात त्यांनी सुद्धा गोविंदांच्या संरक्षणाचा त्यांच्या जीविताचा आणि त्यांच्या साहसाचा विचार केला पाहिजे. या साहसाचा केवळ खेळ होऊ नये. त्या साहसाचा सन्मान करण्याची प्रवृत्ती वाढली पाहिजे आणि म्हणून गोविंदा पथकांच्या या साहसाचा सन्मान करायचा असेल तर त्यांच्यासाठी योग्य तो सन्माननिधी सुद्धा त्या त्या पुरस्कर्त्या मंडळांनी आणि सरकारने उपलब्ध करून देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. अन्यथा दहीहंडी आणि निधीची कोंडी अशी त्यांच्यावर वेळ येऊ शकते. परंपरांमधून सामाजिक स्तरावर एकोपा आणि बंधुभाव जपण्याचे कामही अशा उत्सवांमधून होत असते. त्याचे दुहेरी महत्त्व लक्षात घेतले पाहिजे.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**आपले मित्र हे जर परिसाप्रमाणे असतील,
तर मग आपलं आयुष्य हे सुद्धा सोन्यासारखं बनून जात असतं.**

## पंचांग

**सोमवार, ११ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण द्वितीया**
**नक्षत्र : शततारका**



**रवी उदय- ०६-२०**
**रवी अस्त- १९-०८**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कुंभ**

**श्रावणी सोमवार, शिवामूठ-मूग; संत दंडवते महाराज पुण्यतिथी-गाणगापूर**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे**
(*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



# नाचणीची वडी



★ **साहित्य -**
- १ कप नाचणीचे पीठ
- २ कप सोयाबीनचे पीठ
- १ कप तूप
- १/२ कप जाड पोहे
- १/२ कप डिंक
- १/२ कप जाड किसलेले सुके खोबरे
- १ चमचा वेलची पावडर
- ४ कप गूळ

★ **कृती -** सर्वात आधी कढईत तूप वितळवून त्यात पोहे आणि डिंक वेगवेगळे तळून घ्या. त्यानंतर एका ताटात या दोन्ही गोष्टी काढून चुरून घ्या. आता त्याच तुपात नाचणीचे पीठ आणि सोयाबीनचे पीठ मंद आचेवर भाजून घ्या. गरज लागल्यास त्यात आणखी तूप घाला. आता ३ चमचे पाणी आणि किसलेला गूळ एकत्र करून मध्यम आचेवर वितळवून घ्यावा. गूळ पूर्ण वितळला की, एक उकळी येऊ द्यावी आणि त्यात भाजलेले पीठ, डिंक, पोहे, खोबरं आणि वेलची पूड घालून मिक्स करा. हे मिश्रण तूप लावलेल्या ट्रेमध्ये ओतून त्याच्या वड्या पाडा. तयार नाचणीच्या वडीचा आस्वाद घ्या.

# आशिया बॉक्सिंग स्पर्धेत भारताला ९ पदके निशा आणि मुस्करने सुवर्णपदक पटकाविले



**१९ वर्षांखालील आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय युवा बॉक्सरनी चमकदार कामगिरी केली. भारताच्या महिला बॉक्सर निशा आणि मुस्कर यांनी सुवर्णपदके जिंकली, तर इतर ५ खेळाडूंनी रौप्यपदके जिंकली. या स्पर्धेच्या १९ वर्षांखालील गटात सहभागी होणाऱ्या १० महिला बॉक्सरपैकी ९ पदके घेऊन परततील, ज्यात २ सुवर्ण आणि ५ रौप्यपदके आणि २ कांस्यपदके यांचा समावेश आहे.**

■ बँकॉक

**भारतीय** खेळाडूंनी कझाकस्तान, उझबेकिस्तान आणि चीनसारख्या देशांच्या बॉक्सरना चोख प्रत्युत्तर देऊन आपले कौशल्य सिद्ध केले. निशाने ५४ किलो वजनी गटात तिसऱ्या आणि अंतिम फेरीत चीनच्या सिरुई यांगविरुद्ध आपला खेळाचा स्तर उंचावला आणि ३-१ असा विजय मिळवला, तर मुस्काननं (५७ किलो) आक्रमक खेळ करत कझाकस्तानच्या अयाझान एर्मेकच्या आव्हानाला ३-२ असे पराभूत केले.आरती कुमारीला (७५ किलो) चीनच्या टोंगटोंग गुकडून पराभव पत्करावा लागला तर कृतिका वासनचा (८० किलो) प्रयत्न कझाकस्तानच्या कुरलाय येगिनबाईकीजीविरुद्ध २- ३ असा पराभव टाळण्यास पुरेसा नव्हता. पारची टोकस (८० किलो) उझबेकिस्तानच्या सोबिराखॉन शाहोबिदिनोव्हाविरुद्ध समान फरकाने पराभूत झाली.६० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत विनीला उझबेकिस्तानच्या सेवारा मामातोवाकडून पराभव पत्करावा लागला, तर ६५ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत जपानच्या अरिंडा अकिमोतोने निशाचा ४-१ असा पराभव केला. पुरुष गटाच्या अंतिम फेरीतही तीन भारतीय बॉक्सर आव्हान देतील. भारतीय बॉक्सर्सनी २२ वर्षांखालील गटात आधीच १३ पदके मिळवली आहेत. सोमवारी त्यांचे सुवर्णपदकांचे सामने खेळवले जातील. भारताने १९ वर्षांखालील आणि २२ वर्षांखालील गटात या स्पर्धेत ४० खेळाडूंचा संघ उतरवला आहे.

## अमेरिकन टेनिस स्पर्धेच्या बक्षीसात २० टक्के वाढ

■ न्यूयॉर्क

२४ऑगस्टपासून सुरू होणार्या अमेरिकन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेच्या आयोजकांनी विजेत्यांच्या बक्षीस रकमेत विक्रमी वाढ केली. गेल्या झालेल्या या स्पर्धेच्या बक्षीस रकमेच्या तुलनेत यावेळी २० टक्के वाढ करण्यात आली.या स्पर्धेतील पुरुष आणि महिलांच्या गटातील विजेत्यांसाठी आता ९० दशलक्ष डॉलरची एकूण बक्षिसाची रक्कम जाहीर करण्यात आली. चालू वर्षीच्या टेनिस हंगामामध्ये एटीपी आणि डब्ल्यूटीए टूरवरील मानांकनातील पुरुष आणि महिला टेनिसपटुंना आता बक्षिसाच्या रकमेत समानता राहिल. याचा लाभ मानांकनातील अव्वल टेनिसपटूंना निश्चित मिळेल. पण खालच्या स्तरावरील टेनिसपटू अद्यापही झगडत आहेत. गेल्या वर्षी झालेल्या स्पर्धेत एकूण बक्षिसाची रक्कम ७५ दशलक्ष डॉलरची ठेवण्यात आली होती. पुरुष आणि महिलांच्या एकेरीतील विजेत्यांना प्रत्येकी ५ दशलक्ष डॉलरची रक्कम यावेळी दिली जाईल.

## गोलंदाज यश दयाल अडचणीत यूपी टी-२० लीगमधून बाहेर

■ लखनौ


बलात्कारप्रकरणी आरसीबीचा वेगवान गोलंदाज यश दयालच्या अडचणीत वाढ झाली. त्याला यूपी टी-२० लीगमधून बाहेर काढण्यात आले. यश दयालवर १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा गंभीर आरोप आहे. त्याच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. आयपीएल २०२५ मध्ये आरसीबीच्या विजयी संघाचा भाग असलेल्या यश दयालने या हंगामात १५ सामन्यांत १३ विकेट घेत चमकदार कामगिरी केली होती. यश दयालला यूपी टी-२० लीगमध्ये खेळण्यास बंदी घालण्याचा निर्णय उत्तर प्रदेश क्रिकेट असोसिएशनने घेतला आहे. या लीगमधील गोरखपूर लायन्स संघाने यश दयालला ७ लाख रुपयांना खरेदी केले होते. मात्र, आता तो या लीगमध्ये खेळू शकणार नाही. बलात्कार प्रकरणात यश दयालला राजस्थान उच्च न्यायालयाकडून कोणताही दिलासा मिळाला नाही. न्यायालयाने त्याच्या अटकेला आणि पोलिसांच्या कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला.

## न्यूझीलंडच्या न्यूटनची क्रिकेटमधून निवृत्ती

■ वेलिंग्टन

न्यूझीलंडची महिला स्टार अष्टपैलू खेळाडू थॅमिसन न्यूटनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला. न्यूटन २०१६ च्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकाचा भाग होती. या स्पर्धेत न्यूझीलंडला वेस्ट इंडिजविरुद्धच्या सेमीफायनलमध्ये पराभव पत्करावा लागला होता. न्यूटन वरच्या फळीत फलंदाजी आणि मध्यमगती गोलंदाजी करायची. तिने २०१५ मध्ये न्यूझीलंडसाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

## अमेरिकन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतून स्पेनची टेनिसपटू बेडोसाची माघार




■ न्यूयॉर्क

**न्यूयॉर्क** येथे २४ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या २०२५ च्या टेनिस हंगामातील शेवटच्या अमेरिकन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतून स्पेनची महिला टेनिसपटू पाओला बेडोसाने दुखापतीमुळे माघार घेतली आहे. गेल्या जून महिन्यात झालेल्या विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतील पहिल्याच फेरीत बेडोसाला पराभव पत्करावा लागला होता. बेडोसाने माघार घेतल्याने आता तिच्या जागी जिल टिचमनला संधी दिली जाईल, अशी घोषणा अमेरिकन टेनिस संघटनेने केली. गेल्या वर्षी स्पेनच्या कॉर्नेटने टेनिस क्षेत्रातून निवृत्तीचा निर्णय घेतला होता. चालू वर्षीच्या टेनिस हंगामात तिने निवृत्तीनंतर पुनरागमन केले. स्पेनची २७ वर्षीय बेडोसाने महिला टेनिसपटूंच्या मानांकन यादीत सध्या बारावे स्थान मिळविले. गेल्या जानेवारीत झालेल्या ऑस्ट्रेलियन ग्रँडस्लॅम स्पर्धेत बेडोसाने उपांत्य फेरी गाठली होती. तर गेल्या वर्षी अमेरिकन ग्रँडस्लॅम स्पर्धेत तिने उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली होती.

## टी-२० विश्वचषकात मार्श-हेड सलामीवीर म्हणून उतरणार

■ सिडनी



पुढील वर्षी होणार्या टी-२० विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने आपली सलामीची जोडी निश्चित केली. कर्णधार मिचेल मार्श स्वतः स्फोटक फलंदाज ट्रॅव्हिस हेडसोबत डावाची सुरुवात करणार असल्याची अधिकृत घोषणा केली. डेव्हिड वॉर्नरच्या निवृत्तीनंतर सलामीच्या जागेसाठी सुरू असलेला शोध या निर्णयामुळे संपला. २०२१ च्या टी-२० विश्वचषकात मार्शने तिसर्या क्रमांकावर फलंदाजी करताना संघाला पहिले विजेतेपद मिळवून देण्यात निर्णायक भूमिका बजावली होती. अंतिम सामन्यात तो 'प्लेअर ऑफ द मॅच' ठरला होता. आता कर्णधार म्हणून तो स्वतः सलामीची जबाबदारी स्वीकारणार आहे. मार्श आणि हेड यांनी आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये एकत्र सलामी दिली नसली तरी, एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्यांची जोडी अत्यंत यशस्वी ठरली आहे. त्यांनी ५ डावांमध्ये ७०.५० च्या उत्कृष्ट सरासरीने २८२ धावा केल्या आहेत.

## परेलमध्ये बुध्दिबळ स्पर्धेचे १५ ऑगस्ट रोजी आयोजन

■ मुंबई

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बँक ऑफ बडोदा पुरस्कृत ७ ते १४ वर्षामधील ६ वयोगटातील शालेय मुलामुलींची बीओबी चषक जलद बुद्धिबळ स्पर्धा १५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली आहे. मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना मान्यतेने प्रत्येक वयोगटातील गुणानुक्रमे पहिल्या १५ विजेत्या-उपविजेत्यांना आकर्षक पुरस्कार दिले जातील. दोन वयोगटाचे विजेतेपद पटकाविणाऱ्या एका बुद्धिबळपटूला क्रीडाप्रेमी स्व. सुरेश आचरेकर स्मृती पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते यांनी दिली.राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या सहकार्याने प्रतिवर्षाप्रमाणे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ही स्पर्धा परेल येथील आरएमएमएस वातानुकुलीन सभागृहात स्विस लीग पध्दतीच्या किमान ४ फेऱ्यांमध्ये रंगणार आहे. प्रत्येक साखळी फेरी १५ मिनिटे अधिक ३ सेकंद इन्क्रिमेंटची राहील. संयोजकांतर्फे स्पर्धकांना बुद्धिबळ पट व घड्याळ दिली जाणार आहेत.

## राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत झैद, प्रशांत, समृद्धीची आगेकूच

■ मुंबई



सनी निम्हण यांच्या पुढाकाराने सोमेश्वर फाऊंडेशन आयोजित गोविंदा गार्डन मंगल कार्यालय, पुणे येथे सुरु असलेल्या विनायक निम्हण स्मृती दुसऱ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटाच्या उप उपांत्य फेरीत ठाण्याच्या झैद अहमदने विश्वविजेत्या जळगावच्या संदीप दिवेचा तीन सेटपर्यंत रंगलेल्या अटीतटीच्या सामन्यात ११-२२, २५-४, २५-१६ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. तर दुसरीकडे माजी विश्वविजेत्या मुंबईच्या प्रशांत मोरेने पहिल्या सेटमध्ये आठव्या बोर्डात व्हाईट स्लॅमची नोंद करत मुंबईच्याच सिद्धांत वाडवलकरचा २२-१०, २२-१० असा सरळ दोन सेटमध्ये धुव्वा उडवत आगेकूच केली. महिलांच्या उप उपांत्य सामन्यात ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरने मुबईच्या उर्मिला शेंडगेचा तीन सेटमध्ये २५-६, १९-२१, २५-१९ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. पुरुष एकेरी उपउपांत्य फेरीत रियाझ अकबरला अलीने समीर अंसारीवर २५-४, २३-१६, विकास धारियाने ओमकार नेटकेवर १७-१२, २५-० असा विजय मिळवला. महिला एकेरी उप उपांत्य फेरीत प्राजक्ता नारायणकरने पुष्कर्णी भट्टडला १५-१३, २५-१, सोनाली कुमारीने नीलम घोडकेला २५-२, १०-२५, २५-०, केशर निर्गुणने आकांक्षा कदमला १८-२३, २५-१४, २३-१८ अशी मात दिली.

# प्राण

## आपल्या कसदार अभिनयाने रसिकांच्या हृदयात मानाचे स्थान मिळवणारे ज्येष्ठ अभिनेते



**प्राण किशन सिकंद ऊर्फ 'प्राण' हे खऱ्या अर्थाने बॉलिवूडचा प्राण होते. दमदार आवाज आणि अभिनयाच्या जोरावर त्यांनी एकेकाळी बॉलिवूड गाजवले. खलनायक म्हणून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली होती. प्राण यांचे वडील लाला केवल कृष्णन सिकंद हे सरकारी सेवेत होते. कामामुळे वडिलांची सतत बदली होत असल्याने प्राण यांचे शिक्षण कपूरथळा, उन्नाव, मेरठ, डेहराडून आणि रामपूर या शहरांमध्ये झाले. भारत-पाकिस्तान फाळणीनंतर प्राण हे मुंबईत स्थायिक झाले.**

प्राण नशिबानेच चित्रपटसृष्टीत आले. त्यांनी लाहोरमध्ये फोटोग्राफर म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली होती. मात्र, १९४० नंतर त्यांचे नशीब पालटले. प्राण यांनी बॉलीवूड मध्ये ७० हून अधिक वर्षे काम करून ४०० हून अधिक चित्रपटांत अभिनय केला. हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांचा प्रवेश नूरजहान यांच्या बरोबर 'खानदान' या चित्रपटात १९४२ साली केलेल्या नायकाच्या भूमिकेपासून झाला. प्राण यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात लाहोरमध्ये तयार झालेल्या १७ चित्रपटांमध्ये भूमिका केल्या होत्या. त्यांना यमला जट' या पंजाबी सिनेमात अभिनय करण्याची संधी पहिल्यांदा मिळाली. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांना उपकार, आँसू बन गये फूल, बेईमान या चित्रपटांमधील उत्कृष्ट भूमिकांबद्दल फिल्मफेअर पुरस्कार मिळाले होते. याशिवाय अन्य अनेक पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत. भारतीय सिनेमातील योगदानाबद्दल भारत सरकारने पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. तर चित्रपटसृष्टीतील



सर्वोच्च मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात आले. बाल ब्रम्हचारी' या चित्रपटाद्वारे खलनायक म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली होती. त्यांनी जंजीर, कर्ज, डॉन या चित्रपटांमध्ये विविधांगी भूमिका साकारल्या. प्राण यांनी दमदार अभिनयाने खलनायकी व चरित्र अभिनेता म्हणून अनेक चित्रपट गाजवले.

सर्वच चित्रपटांमध्ये त्यांनी जबरदस्त भूमिका केल्या. राम और श्याम, खानदान, दुनिया, जिस देश मे गंगा बहती है, उपकार, जॉनी मेरा नाम, जंजीर, डॉन, साहिब, आँसू बन गये फुल, बेमान, बाल ब्रम्हचारी आदी चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका प्रचंड गाजल्या. प्राण यांचा अभिनय एवढा दमदार होता की 'राम और श्याम' या चित्रपटानंतर प्रेक्षक खासगी आयुष्यातसुद्धा त्यांच्याकडे खलनायक म्हणून पाहू लागले होते. त्यांच्याविषयीची एक किस्सा प्रसिध्द आहे,की लोकांमध्ये त्यांची भिती अशाप्रकारे होती,की त्याकाळी कुणीच आपल्या मुलाचे नाव प्राण ठेवत नव्हते. मात्र उपकार'मधील मलंग चाचाच्या भूमिकेनंतर त्यांची

पडद्यावरील प्रतिमा साफ बदलून गेली. फोटोग्राफी आणि अभिनयाबरोबर प्राण यांना खेळातही विशेष आवड होती. त्यांनी अनेक क्रिकेटपटूंना सढळ हस्ते आर्थिक मदत केली होती. त्यांना फुटबॉलचीही आवड होती. त्यांनी एक फुटबॉल क्लबही स्थापन केला होता. प्राण यांचे १२ जुलै २०१३ रोजी निधन झाले. •••

# शासकीय जमिनीवरील झोपडपट्ट्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण होणार

**मुंबई** - मुंबईसह उपनगरातील केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपड्या वगळता राज्य शासनाच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्ट्यांचे एसआरए कार्यालयाच्या देखरेखीखाली बायोमेट्रिक सर्वेक्षणाचे काम सुरू केले जाणार आहे. अधिक माहिती देताना वरील कार्यालयातील एका अधिकाऱ्याने असे सांगितले की, मुंबई महापालिका, म्हाडा प्राधिकरण व राज्य शासन यांच्या मालकीच्या जमिनीवर वर्षानुवर्षे उभ्या असलेल्या झोपडपट्ट्यांचे स्वतंत्र एजन्सी मार्फत बायोमेट्रिक सर्वेक्षण केले जाणार आहे. या कामांवर एसआरए कार्यालय देखरेख ठेवणार आहे. मुंबईत किती झोपड्या आहेत. त्या घरांमध्ये कोण राहते. आणि किती वर्षांपासून याची माहिती तयार केली जाणार आहे. त्यामुळे भविष्यात वास्तव्यास असलेल्या झोपडीधारकांची ओळख पटविणे सोपे होणार आहे.

## शिवप्रताप सहकारी पतपेढी मर्यादित मुंबई-४००००३
### अधिमंडळाची ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

या नोटीसद्वारे वरील पतपेढीच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२४-०८-२०२५ रोजी सायंकाळी ०४-०० वाजता बद्री बाग हॉल, पहिला मजला, ६३ सैय्यद मुरवरी स्ट्रीट, मस्जिद स्टेशन जवळ, मस्जिदबंदर (प) मांडवी कोळीवाडा, मुंबई ४००००३ येथे नमुद केलेल्या कामकाजाचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

दि.११/०८/२०२५

**श्री विजयकुमार दत्तात्रय शेंडगे**
**उपाध्यक्ष**
**शिवप्रताप सहकारी पतपेढी मर्यादित मुंबई-३**

## जाहीर प्रगटन

अर्जदार : नन्हकु निहोर चौरसिया

विरुध्द

गैरअर्जदार : वैद्यकीय अधिकारी, जन्म/मृत्यु नोंदणी, एफ/नॉर्थ वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, फ्लॅट नं. ९६, भाऊदाजी रोड, माहेश्वरी सर्कलजवळ, ब्रहामणीवाडा, माटुंगा ईस्ट, मुंबई-४०००११

बनाम : सर्व नागरीक

अर्जदार यांनी रिता नारकु चौरसिया यांचा मृत्यु दिनांक २५/०३/२०२१ रोजी मृत्यु ठिकाणः- मोतीलाल नेहरू नगर एस.एम. रोड अॅन्टॉप हिल चर्च येथे झालेला असल्याने व सदरच्या मृत्युची नोंदणी अभिलेख उपलब्ध नसल्याने व त्यांचा मृत्युची नोंद गैरअर्जदार उपनिबंधक तथा वैद्यकीय अधिकारी, जन्म-मृत्यु नोंदणी विभाग, एफ/नॉर्थ, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, फ्लॅट नं.९६, भाऊदाजी रोड, माहेश्वरी सर्कलजवळ, ब्रहामणीवाडा, माटुंग ईस्ट, मुंबई-४०००१९ यांचे अभिलेखावर घेऊन जन्म/मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम-१९६९ मधील कलम १३ (३) चे अंतर्गत या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी कोणाचेही हितसंबंध असल्यास अथवा कोणासही आक्षेप/हरकत घ्यायावयाचा असेल तर हा जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत किंवा नेमलेल्या तारखेच्या आंत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत/आक्षेप/म्हणणे लेखी स्वरुपात कळवाव्यात. तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीच्या आत कोणीही योग्य हरकत/आक्षेप/म्हणणे दाखल न-केल्यास सदरहू कार्यालय अर्जदारास त्यांनी मागणी केलेली जन्माच्या/मृत्युच्या नोंदणीसाठी केलेला अर्ज लागलीच पुरावा घेऊन अर्ज निकाली काढण्यात येईल, मंजुर/नामंजुर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**कार्यालयाचा पत्ता:-** तहसिलदार, जमीन महसूल वसुली शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, १ ला मजला, खोली क्र-१०३, ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

(अश्विनीकुमार पोतदार)
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,
मुंबई शहर

# शिंदे गटाचे शाखाप्रमुख सुभाष येरुणकर भाजपात

■ मुंबई

**मागाठाणे** विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. आमदार प्रकाश सुर्वे यांचे निकटवर्तीय आणि वार्ड क्रमांक ११ चे शिवसेना शाखाप्रमुख सुभाष येरुणकर यांनी भाजपात प्रवेश केला आहे. पालिका निवडणुकांपूर्वी पक्षांतराला वेग आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाने उबाठा आणि काँग्रेसमधील अनेक माजी नगरसेवकांना आपल्या पक्षात प्रवेश दिला आहे. मात्र आज भाजपाने शिंदे गटातील कार्यकर्त्याला आपल्या गळाला लावले.

येरुणकर गेल्या २० वर्षांपासून शिवसेनेत सक्रिय होते. आज त्यांनी आमदार प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपाचा झेंडा हाती घेतला.

## दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई (परिसमापना अंतर्गत)

मुख्य कार्यालयः १ला मजला, पद्मावती दर्शन, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३.
दूर.: ०२२-३५२२०८७९ / ०२२-३५२२ १०२९ ईमेल: recovery@citycoopbank.com

### (३) स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना (नियम ८(६) च्या शर्ती पहा)

**सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफैसी कायदा) अन्वये मालमत्तेची (तारण संपत्ती) विक्री**

तमाम जनतेस आणि विशेषतः कर्जदार, जामीनदार, मालक आणि गहाणवटदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रतिभुती धनकोकडे गहाणवट/प्रभारित असलेली निम्न उल्लेखित मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि; मुंबई (प्रतिभुती धनको) च्या अधिकृत अधिकारी (एओ) यांनी घेतला होता, ती कर्जदार मे. नरेंद्र डी. शाह, आणि जामीनदार १) श्री. हिमांशु एन. शाह, २) मे. प्रशांती लॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. ३) सौ. रेवती हिमांशु शाह, ४) सौ. अमीता नरेंद्र शाह, ५) मे. कांदिवली बालाजी इन्व्हेस्टमेन्ट प्रा. लि. यांच्याकडून प्रतिभुती धनकोस देय असलेल्या दि. ३०.०६.२०२५ रोजीनुसार रु. ६,१६,५९,०६०.९० (डिसेंबर २०२४ पर्यंतचे व्याज समाविष्ट) च्या वसुलीकरिता खाली दिलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "तेथे जे आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्जदार/मालमत्तेचे मालक यांचे नाव | तारण संपत्ती(त्तीं)चे तपशील | राखीव किंमत / इसारा रक्कम अनामत | मालमत्ता पाहणीचा दिनांक आणि वेळ | लिलावाचे ठिकाण / लिलावाचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार :** मे. नरेंद्र डी. शाह **मालक** मे. कांदिवली बालाजी इन्व्हेस्टमेन्ट प्रा. लि. | तुळिंज रोड, नालासोपारा (पूर्व), तालुका वसई जि.- पालघर येथील "गोल्डन ट्रेड सेंटर को-ऑप. हौसिंग सोसायटी" या इमारत संस्थेमधील तळमजल्यावरील दुकान क्र. १०३, १०४, १०५, ११९ आणि १२०, एकूण बिल्ट अप क्षेत्रफळ चौ.फू. मध्ये अनुक्रमे ७८, ७८, १०८, १५० आणि १५० चौ.फू. | रु. ५१,१२,०००/- (रु. एकावन्न लाख बारा हजार मात्र) / रु. ५,००,०००/- (रुपये पाच लाख मात्र) | दि. १८.०८.२०२५ स. ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत आणि दि. २५.०८.२०२५ स. ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत आणि दि. ०८.०९.२०२५ स. ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत | दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई, १ ला मजला, पद्मावती दर्शन, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३. दूर. ०२२ ३५२२ ०८७९ ०२२ ३५२२ १०२९ / लिलावाचा दिनांक आणि वेळ दि. १२.०९.२०२५ रोजी दु. १२.०० वा. |

**विक्रीच्या अटी आणि शर्तीः-**

कर्जदार/जामीनदार/मालक/गहाणवटदार यांना वरील लिलावाच्या दिनांकापूर्वी थकीत देणी पुढील व्याजासह भरणा करण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे. अन्यथा ही तारण संपत्ती वेळापत्रकानुसार लिलाव करण्यात येईल आणि विक्री करण्यात येईल.

१. प्रस्ताव "मे. नरेंद्र डी. शाह (कर्जदार) यांच्या कर्ज खात्याच्या संबंधात स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव" असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून सादर करावे आणि सदर मोहोरबंद पाकीट संभाव्य बोलीदाराद्वारे वरील उल्लेखित लिलावाच्या ठिकाणी दि. ११.०९.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ४.०० वाजेपर्यंत सादर करावे आणि ईएमडी रक्कम दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई च्या नावे **बँकः आयडीबीआय, शाखा - गिरगाव, खाते क्र. ०४५३१०२०००००३११७, आयएफएससी कोड IBKL0000453** येथे आरटीजीएस करून भरावी.
२. अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, वरील जागेवर (तारण संपत्ती) कोणतेही बोजे नाही. **तथापि, इच्छुक बोलीदाराने त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी बोजे, लिलावास ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचे शीर्षक आणि मालमत्तेस बाधित करणारे दावे/हक्क/देणी यासंबंधी त्यांची स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी.** लिलाव जाहिरात दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि. चे कोणतेही दायित्व किंवा कोणतेही प्रतिनिधित्व दर्शवित नाही आणि कोणतीही वचनबद्धता असल्याचे मानण्यात येणार नाही. मालमत्ता बँकेस ज्ञात असलेल्या किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोज्यांसह विक्री करण्यात येत आहे. अधिकृत अधिकारी/प्रतिभुती धनको कोणत्याही तृतिय पक्षकार दावे/हक्क/देण्यांकरिता कोणत्याही प्रकारे उत्तरदायी नसेल. विक्रीस ठेवण्यात आलेल्या जागांसंबंधी बोली सादर केल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दावा विचारात घेण्यात येणार नाही.
३. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेची पाहणी करणे आणि त्यांचे समाधान करून घेणे ही इच्छुक बोलीदारांची जबाबदारी असेल.
४. सादर करावयाची बोली किंमत राखीव किंमतीपेक्षा जास्त असावी आणि बोलीदार त्यांचे पुढील प्रस्ताव रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवू शकतात.
५. यशस्वी बोलीदाराची इसारा रक्कम अनामत (ईएमडी) विक्री मोबदला म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची ईएमडी परत करण्यात येईल.
६. ईएमडीवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही. यशस्वी बोलीदाराने आधीच भरलेली ईएमडी समाविष्ट असलेली विक्री किमतीच्या २५% रक्कम त्याच दिवशी किंवा अधिकृत अधिकाऱ्याद्वारे बोली किमत स्वीकारल्याच्या दिवसाच्या पुढील कामकाजाच्या दिवसापेक्षा उशीर न करता भरावयास हवी आणि विक्री किमतीची शिल्लक विक्रीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी जमा करावी. लिलाव विक्री प्रतिभुती धनको म्हणजेच दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबईच्या मंजुरीच्या अधीन आहे. यशस्वी बोलीदाराद्वारे रक्कम जमा न केल्यास आधी भरलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल आणि सदर मालमत्ता पुनर्लिलावास ठेवण्यात येईल आणि थकबाकीदार बोलीदाराचा सदर मालमत्ता/रकमेच्या संदर्भात कोणताही दावा/हक्क नसेल.
७. खरेदीदाराने लागू मुद्रांक शुल्क/नोंदणी शुल्क/इतर प्रभार, इ. आणि कोणासह द्यावयाचे सर्व वैधानिक/अ-वैधानिक देणी, कर, देखभाल, मूल्यांकन शुल्क, इ, भरावयाचे आहेत.
८. अधिकृत अधिकारी/बँक उच्चतम प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा लिलाव स्थगित करण्याचे/पुढे ढकलण्याचे/रद्द करण्याचे किंवा मालमत्ता किंवा तिचा भाग कोणत्याही टप्प्यावर लिलाव प्रक्रियेमधून मागे घेण्याचे संपूर्ण अधिकार आणि स्वातंत्र्य त्यांना आहे.
९. विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदारा(रां)च्या नावे पारित करण्यात येईल आणि अन्य कोणत्याही नावे पारित करण्यात येणार नाही.
१०. बोलीदाराने विक्री/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे वाचन केल्याचे आणि समजून घेतल्याचे मानण्यात येईल आणि त्यास बांधिल राहतील.

(मे. नरेंद्र डी. शाह, कर्जदार आणि जामीनदार १) श्री. हिमांशु एन. शाह, २) मे. प्रशांती लॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. ३) सौ. रेवती हिमांशु शाह, ४) सौ. अमीता नरेंद्र शाह, ५) मे. कांदिवली बालाजी इन्व्हेस्टमेन्ट प्रा. लि. यांना लिलाव दिनांक १२.०९.२०२५ रोजी दु. १२.०० वा. दिलेल्या पत्त्यावर उपस्थित राहण्याचे याद्वारे सूचित करण्यात येत आहे.)

सदर प्रसिद्धी ही वरील सदर कर्जाचे कर्जदार/जामीनदार/मालक/गहाणवटदार यांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

**(सौ. श्रीया एस मालगी)**
**अधिकृत अधिकारी**
**दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई**
**परिसमापनाअंतर्गत**

**दिनांकः ११.०८.२०२५**
**ठिकाण - मुंबई**



**स्वातंत्र्य दिनाच्या पाश्वभूमीवर भाजपने तिरंगा यात्रा काढली होती. त्यावेळी सायन कोळीवाडा येथे भाजपचे आमदार कॅप्टन तमिळ सेल्वन उपस्थित होते. (छाया: दिपक साळवी)**

# जिल्हा नियोजन समितीची बैठक न झाल्याने कामे कागदावर

■ मुंबई

**एप्रिल** ते ऑगस्ट या पाच महिन्यांच्या कालावधीत शासनाच्या शहर जिल्हा नियोजन समितीची एकही बैठक न झाल्याने या समितीच्या निधीतून केली जाणारी नागरी विकासकामे कागदावरच पडून आहेत, अशी माहिती म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या कार्यालयातून देण्यात आली.

गेल्या वर्षी जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली होती. यामध्ये यंदाच्या कामांसाठी ६५० कोटी रुपयांची तरतुदीला बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. आता या मंजूर झालेल्या ६५० कोटी रुपयांच्या निधीतून कामांचे वाटप व त्यावर होणारा खर्च यासाठी समितीची बैठक घेतली जाते. मात्र गेल्या पाच महिन्यांत शहर जिल्हा नियोजन समितीची बैठक न झाल्याने निधीअभावी कुलाबा, मलबार हिल, भायखळा, शिवडी, सायन, माहिम, धारावी, माझगाव आदि भागांत असलेल्या झोपडपट्ट्यांतील नागरी विकास कामे खोळंबली आहेत, असे म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या कार्यालयातील अधिकाऱ्याचे म्हणणे आहे.

# रेल्वेच्या परतीच्या तिकिटावर २० टक्के सवलत मिळणार

**भारतीय रेल्वे प्रशासनाचा निर्णय**

■ नवी दिल्ली

**रेल्वे** प्रशासनाने विशेष रेल्वेगाड्यांत येण्या-जाण्याचा प्रवास एकत्र बुक केल्यास परतीच्या तिकिटावर २० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. 'राउंड ट्रिप पॅकेज स्कीम' असे या योजनेचे नाव असून या योजनेचे बुकिंग १४ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. सुरुवातीला ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येणार आहे.

केवळ फेस्टिव्हल स्पेशल आणि नियमित मेल/एक्स्प्रेस गाड्यांमध्ये या नव्या योजनेचा लाभ मिळणार आहे. राजधानी, शताब्दी, दुरंतो, वंदे भारत, तेजस आणि सुविधा एक्स्प्रेस यांसारख्या प्रीमियम गाड्यांसाठी ही योजना लागू असणार नाही. ही सवलत १३ ते २६ ऑक्टोबरदरम्यान जाणाऱ्या प्रवासासाठी आणि १७ नोव्हेंबर ते १ डिसेंबरदरम्यान परत येणाऱ्या प्रवासासाठी लागू असेल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी येण्या-जाण्याची दोन्ही तिकिटे एकाच वेळी बुक करणे अनिवार्य आहे. दोन्ही तिकिटांवर प्रवाशाचे नाव, वय, बोर्डिंग स्टेशन, जाण्याचे ठिकाण व प्रवासाचा वर्ग यासारखी सर्व माहिती समान असणे आवश्यक आहे.

# उत्तरकाशीच्या जलप्रलयानंतर पाळधीतील १३ युवक परतले

■ जळगाव

**उत्तराखंड** येथील उत्तरकाशीतील जलप्रलयानंतर जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पाळधी गावातील १३ युवक अडकले होते. ते आज सुखरूप त्यांच्या गावात परतले. यावेळी मंत्री गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत त्यांचे कुटुंबीय व ग्रामस्थांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले.

त्यांच्यातील तरुणाने सांगितले की, आम्ही गंगोत्री येथे दर्शन घेतले आणि आम्हाला या दुर्घटनेबद्दल समजले. आम्ही घटनास्थळापासून फक्त २० किमी दूर होतो. पोलिसांनी आम्हाला तेथून सुरक्षित स्थळी हलवले. त्याठिकाणी नेटवर्क नसल्याने आम्ही घरच्यांशी संपर्क करू शकत नव्हतो. त्यांच्या पालकांनी सांगितले की, दुर्घटना घडली तेव्हापासून माध्यमांमध्ये बातम्या पाहात होतो. मुलांशी कोणताही संपर्क होत नव्हता. त्यामुळे आम्हाला काळजी वाटत होती.

## दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई (परिसमापना अंतर्गत)

मुख्य कार्यालयः १ला मजला, पद्मावती दर्शन, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३.
दूर.: ०२२-३५२२०८७९ / ०२२-३५२२ १०२९ ईमेल: recovery@citycoopbank.com

### (३) स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना (नियम ८(६) च्या शर्ती पहा)

**सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफैसी कायदा) अन्वये मालमत्तेची (तारण संपत्ती) विक्री**

तमाम जनतेस आणि विशेषतः कर्जदार, जामीनदार, मालक आणि गहाणवटदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रतिभुती धनकोकडे गहाणवट/प्रभारित असलेली निम्न उल्लेखित मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि; मुंबई (प्रतिभुती धनको) च्या अधिकृत अधिकारी (एओ) यांनी घेतला होता, ती कर्जदार मे. हिमांशु एन. शाह, आणि जामीनदार १) श्री. नरेंद्र डी. शाह, २) मे. प्रशांती लॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. ३) सौ. रेवती हिमांशु शाह, ४) सौ. अमीता नरेंद्र शाह, ५) मे. कांदिवली बालाजी इन्व्हेस्टमेन्ट प्रा. लि. यांच्याकडून प्रतिभुती धनकोस देय असलेल्या दि. ३०.०६.२०२५ रोजीनुसार रु. ५,३८,७५,७४३.४० (डिसेंबर २०२४ पर्यंतचे व्याज समाविष्ट) च्या वसुलीकरिता खाली दिलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "तेथे जे आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्जदार/मालमत्तेचे मालक यांचे नाव | तारण संपत्ती(त्तीं)चे तपशील | राखीव किंमत / इसारा रक्कम अनामत | मालमत्ता पाहणीचा दिनांक आणि वेळ | लिलावाचे ठिकाण / लिलावाचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार :** मे. हिमांशु नरेंद्र शाह **मालक** मे. कांदिवली बालाजी इन्व्हेस्टमेन्ट प्रा. लि. | तुळिंज रोड, नालासोपारा (पूर्व), तालुका वसई जि.- पालघर येथील "गोल्डन ट्रेड सेंटर को-ऑप. हौसिंग सोसायटी" या इमारत संस्थेमधील तळमजल्यावरील दुकान क्र. ८६, ८७, ८८, ८९ आणि १०२, एकूण बिल्ट अप क्षेत्रफळ चौ.फू.मध्ये अनुक्रमे ६६, ४८, ६६, १३८ आणि ७८ चौ.फू. | रु. ३१,६८,०००/- (रु. एकतीस लाख अडुसष्ट हजार मात्र) / रु. ५,००,०००/- (रुपये पाच लाख मात्र) | दि. १८.०८.२०२५ स. ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत आणि दि. २५.०८.२०२५ स. ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत आणि दि. ०८.०९.२०२५ स. ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत | दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई, १ ला मजला, पद्मावती दर्शन, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३. दूर. ०२२ ३५२२ ०८७९ ०२२ ३५२२ १०२९ / लिलावाचा दिनांक आणि वेळ दि. १२.०९.२०२५ रोजी दु. १.०० वा. |

**विक्रीच्या अटी आणि शर्तीः-**

कर्जदार/जामीनदार/मालक/गहाणवटदार यांना वरील लिलावाच्या दिनांकापूर्वी थकीत देणी पुढील व्याजासह भरणा करण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे. अन्यथा ही तारण संपत्ती वेळापत्रकानुसार लिलाव करण्यात येईल आणि विक्री करण्यात येईल.

१. प्रस्ताव "मे. हिमांशु एन. शाह (कर्जदार) यांच्या कर्ज खात्याच्या संबंधात स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव" असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून सादर करावे आणि सदर मोहोरबंद पाकीट संभाव्य बोलीदाराद्वारे वरील उल्लेखित लिलावाच्या ठिकाणी दि. ११.०९.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ४.०० वाजेपर्यंत सादर करावे आणि ईएमडी रक्कम दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई च्या नावे **बँकः आयडीबीआय, शाखा - गिरगाव, खाते क्र. ०४५३१०२०००००३११७, आयएफएससी कोड IBKL0000453** येथे आरटीजीएस करून भरावी.
२. अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, वरील जागेवर (तारण संपत्ती) कोणतेही बोजे नाही. **तथापि, इच्छुक बोलीदाराने त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी बोजे, लिलावास ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचे शीर्षक आणि मालमत्तेस बाधित करणारे दावे/हक्क/देणी यासंबंधी त्यांची स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी.** लिलाव जाहिरात दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि. चे कोणतेही दायित्व किंवा कोणतेही प्रतिनिधित्व दर्शवित नाही आणि कोणतीही वचनबद्धता असल्याचे मानण्यात येणार नाही. मालमत्ता बँकेस ज्ञात असलेल्या किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोज्यांसह विक्री करण्यात येत आहे. अधिकृत अधिकारी/प्रतिभुती धनको कोणत्याही तृतिय पक्षकार दावे/हक्क/देण्यांकरिता कोणत्याही प्रकारे उत्तरदायी नसेल. विक्रीस ठेवण्यात आलेल्या जागांसंबंधी बोली सादर केल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दावा विचारात घेण्यात येणार नाही.
३. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेची पाहणी करणे आणि त्यांचे समाधान करून घेणे ही इच्छुक बोलीदारांची जबाबदारी असेल.
४. सादर करावयाची बोली किंमत राखीव किंमतीपेक्षा जास्त असावी आणि बोलीदार त्यांचे पुढील प्रस्ताव रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवू शकतात.
५. यशस्वी बोलीदाराची इसारा रक्कम अनामत (ईएमडी) विक्री मोबदला म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची ईएमडी परत करण्यात येईल.
६. ईएमडीवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही. यशस्वी बोलीदाराने आधीच भरलेली ईएमडी समाविष्ट असलेली विक्री किमतीच्या २५% रक्कम त्याच दिवशी किंवा अधिकृत अधिकाऱ्याद्वारे बोली किमत स्वीकारल्याच्या दिवसाच्या पुढील कामकाजाच्या दिवसापेक्षा उशीर न करता भरावयास हवी आणि विक्री किमतीची शिल्लक विक्रीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी जमा करावी. लिलाव विक्री प्रतिभुती धनको म्हणजेच दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबईच्या मंजुरीच्या अधीन आहे. यशस्वी बोलीदाराद्वारे रक्कम जमा न केल्यास आधी भरलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल आणि सदर मालमत्ता पुनर्लिलावास ठेवण्यात येईल आणि थकबाकीदार बोलीदाराचा सदर मालमत्ता/रकमेच्या संदर्भात कोणताही दावा/हक्क नसेल.
७. खरेदीदाराने लागू मुद्रांक शुल्क/नोंदणी शुल्क/इतर प्रभार, इ. आणि कोणासह द्यावयाचे सर्व वैधानिक/अ-वैधानिक देणी, कर, देखभाल, मूल्यांकन शुल्क, इ, भरावयाचे आहेत.
८. अधिकृत अधिकारी/बँक उच्चतम प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा लिलाव स्थगित करण्याचे/पुढे ढकलण्याचे/रद्द करण्याचे किंवा मालमत्ता किंवा तिचा भाग कोणत्याही टप्प्यावर लिलाव प्रक्रियेमधून मागे घेण्याचे संपूर्ण अधिकार आणि स्वातंत्र्य त्यांना आहे.
९. विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदारा(रां)च्या नावे पारित करण्यात येईल आणि अन्य कोणत्याही नावे पारित करण्यात येणार नाही.
१०. बोलीदाराने विक्री/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे वाचन केल्याचे आणि समजून घेतल्याचे मानण्यात येईल आणि त्यास बांधिल राहतील.

(मे. हिमांशु एन. शाह, कर्जदार आणि जामीनदार १) श्री. नरेंद्र डी. शाह, २) मे. प्रशांती लॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. ३) सौ. रेवती हिमांशु शाह, ४) सौ. अमीता नरेंद्र शाह, ५) मे. कांदिवली बालाजी इन्व्हेस्टमेन्ट प्रा. लि. यांना लिलाव दिनांक १२.०९.२०२५ रोजी दु. १.०० वा. दिलेल्या पत्त्यावर उपस्थित राहण्याचे याद्वारे सूचित करण्यात येत आहे.)

सदर प्रसिद्धी ही वरील सदर कर्जाचे कर्जदार/जामीनदार/मालक/गहाणवटदार यांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

**(सौ. श्रीया एस मालगी)**
**अधिकृत अधिकारी**
**दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई**
**परिसमापनाअंतर्गत**

**दिनांकः ११.०८.२०२५**
**ठिकाण - मुंबई**

# कल्याण-डोंबिवलीत मांसविक्री बंदी ! मविआ नेत्यांचा आक्षेप

■ कल्याण

**कल्याण-डोंबिवली** महापालिकेने स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी मांसविक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला असून या निर्णयाला उबाठा आमदार आदित्य ठाकरे आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

महापालिकेच्या बाजार व परवाना विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड यांनी पालिका क्षेत्रातील सर्व कत्तलखाने चालकांना नोटीस पाठवून १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून १५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत कत्तलखाने आणि मांसविक्री बंद ठेवण्याच्या सूचना केल्या आहेत.

यावर प्रतिक्रिया देताना आदित्य ठाकरे म्हणाले की,आम्ही काय खायचे किंवा नाही हे ठरवणारे आयुक्त कोण? ते का सांगतील आम्ही शाकाहार करायचा की मांसाहार? डोंबिवलीतील पलावा येथील रस्ता खराब झाला आहे, त्याकडे लक्ष दिले जात नाही आणि उलट चिकन, मटण विक्रीवर बंदी घातली जाते. या आयुक्तांना निलंबित केले पाहिजे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, कल्याण-डोंबिवलीत मासविक्री बंद करण्याचा निर्णय हा स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे. लोकांनी कधी काय खावे आणि विकावे यावर कोणाच्याही बापाचे राज्य नाही. ज्या दिवशी देशाला स्वातंत्र्य मिळाले, त्याच दिवशी आमचे स्वातंत्र्य हिरावले जात आहे.

# बिहार उपमुख्यमंत्र्यांच्या नावे दोन ओळखपत्र क्रमांक उघड

■ पटना

**बिहारचे** विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांच्यानंतर आता उपमुख्यमंत्री विजय सिन्हा यांच्याही नावावर दोन वेगवेगळे ईपीआयसी (इलेक्टोरल फोटो आयडेंटीटी कार्ड) क्रमांक आढळले आहेत. हे क्रमांक लखीसराय आणि पाटण्याच्या बांकीपूर विधानसभा मतदारसंघात नोंदवले आहेत. दोन्ही ओळखपत्रांवर पत्ता आणि वय वेगवेगळे असून नाव व वडिलांचे नाव एकच आहे. मात्र, एका ओळखपत्रात वडिलांचे नाव दिवंगत शारदा रमण सिंह असे नमूद आहे.

परीक्षण

# कमकुवत पटकथा-दिग्दर्शनामुळे वाया गेलेला चांगला विषय

# "बिंदिया के बाहुबली" सीझन १

**अराजक माजवणारे गुंड, भ्रष्ट राजनेता, आणि गुंडांसमोर शरण आलेले पोलीस, त्रस्त जनता, महत्वाकांक्षा, संघर्ष, सूड, या सर्व गोष्टी ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर नुकत्याच प्रदर्शित झालेल्या बिंदिया के बाहुबली या सीरिजच्या मध्ये प्रेक्षकांना पहायला मिळतात.**

### कथानक

बिहारमधील काल्पनिक लहान शहर बिंदियामध्ये बडा दावन या गुंडाचे साम्राज्य आहे. हा गुंड सामान्य जनतेचे प्रश्न सोडवून त्यांना मिंध बनवतो, त्यांच्या मनामध्ये भीतीयुक्त आदराचे स्थान निर्माण करतो, राज्यातील मोठ्या राजनेत्याचा प्रचार करतो, आणि जनतेवर दबाव आणत नेत्यासाठी मते गोळा करतो. निवडणुकीच्या काळात बडा दावन आपल्या पुतण्याला निवडणुकीसाठी उभा करण्याचे राजनेत्याला सांगतो, पण ही गोष्ट




नेत्याला रुचत नाही. परिणामी, एका हत्येच्या खोट्या आरोपामध्ये बडा दावन जेलमध्ये जातो. त्याचा मुलगा छोटूचे राजनेता बनण्याचे स्वप्न आहे, आणि त्यासाठी तो काहीही करायला तयार आहे. बडा दावनचा लहान भावाला मोठ्या भावाच्या गादीवर बसायची इच्छा आहे. बडा दावनचा दुसरा मोठा पोलीस आहे, तिसरा मुलगा नुकताच अमेरिकेतून परतला आहे आणि वडिलांचा धंदा आता ऑनलाइन करायचा आहे. मुलगी डॉक्टर असली तरी गुंडापेक्षा कमी नाही. बडा दावन जेलमध्ये गेल्यानंतर त्याच्या कुटुंबात, शहरात, आणि बिंदियामध्ये अनेक गोष्टी घडतात. त्या सर्व इथे नमूद करणे अशक्य असल्याने सीरिज पहावी लागेल.

### कशी आहे सीरिज?

सीरिजचा विषय खरोखरच चांगला आहे. परंतु लेखक आणि दिग्दर्शक अमित कुमारना तो योग्य पद्धतीने सादर करता आलेला नाही. कथेमधील उपकथानक अनेक ठिकाणी सोडून देण्यात आले आहे. काही व्यक्तिरेखा अशा का वागतात, याचे कारण कुठेही सापडत नाही. त्यामुळे एक चांगली कथा वाया गेली आहे. 'मिर्झापूर' आणि 'पंचायत' सारख्या ग्रामीण सीरिजच्या लोकप्रियतेचा फायदा उठवण्यासाठी बिंदिया के बाहुबली ही सीरिज बनवली गेली आहे. बडा दावन या गुंडाचा शहरातील, राज्यातील जनतेवर आणि पोलीसांवर किती प्रभाव आहे, हे दाखवणारी दृश्ये फारशी दिसत नाहीत. या गुंडाचा मुलगा पोलीसात का जातो? तो आपल्या कुटुंबापेक्षा वेगळा आहे का, की त्यांना मदत करण्यासाठी पोलीस बनला आहे, हे स्पष्ट होत नाही. अमेरिकेतून शिकून परतलेला मुलगा तिथल्या क्लबमध्ये नाचणाऱ्या एका बाईला घेऊन येतो आणि तिच्याशी लग्न करायचा हट्ट करतो, हे देखील न पटण्यासारखे आहे. असे अनेक मुद्दे सीरिज बघताना स्पष्ट होत नाहीत. व्यक्तीरेखांची पूर्ण मानसिकता समोर येत नाही. बडा दावन इतका मोठा गुंड असताना सुद्धा स्वतःला जेलमधून सोडवण्यास का असमर्थ आहे? त्याचा मुलगा छोटूच्या पत्नीशी प्रेमाचे संबंध असताना तो त्यांच्याच मालकीच्या डान्स क्लबमध्ये नाचणाऱ्या परदेशी मुलीच्या प्रेमात का पडतो? भावनिक आधारासाठी तिच्याकडे का जातो? हे प्रश्न अनुत्तरीत आहेत, कारण त्यांचे संबंध अधिकतर शारीरिक पातळीवरचे आहेत, असे दाखवण्यात आले आहे. गुंडावर आधारित सीरिज असल्यामुळे संवादांमध्ये भरपूर शिव्या ऐकायला मिळतात. केवळ बिहार आणि उत्तर प्रदेशातील जनतेला खुश करण्याच्या उद्देशाने आणि तेच ही सीरिज बघतील असा संकुचित दृष्टिकोन ठेवला असल्याने डान्स बारच्या नावाखाली शरीरप्रदर्शन, कामुक नृत्यअदा, अपुरे कपडे घातलेल्या मुली आणि टिपिकल भोजपुरी-बिहारी गाणी यांचा भडीमार करण्यात आला आहे. त्यामुळे सीरिज कृत्रिम बनली आहे. सई तम्हाणकर आणि शीबा चड्ढा यांच्या व्यक्तिरेखांना फारसा वाव दिला गेलेला नाही. केवळ सहा एपिसोड असूनही पटकथा संथ बनली आहे. संवाद आणि वाद यावर भर दिल्याने सीरिजच्या विषयासाठी ज्या ॲक्शनची, चकमकीची आवश्यकता होती, ती अगदी दुर्मिळ आहे. कुठेही गुंड गटातील वैर, त्यांच्यातील चकमकी, एखादा प्रसंगातील विनोद किंवा विनोदी पात्र यांची देखील कमतरता आहे. सीरिजसाठी बनवलेले सेट्स चांगले आहेत. लहान शहराचे वातावरण, धुळीने माखलेल्या गल्ल्या छोट्या शहराचे प्रतिनिधित्व करतात. तरीही ही सीरिज एक निराशाजनक प्रयत्न आहे असेच म्हणावे लागेल. भले सीरिजचा दुसरा सीझन बनवला जाणार असला तरी या पहिल्या सीझनचा शेवट देखील अर्धवट सोडून देण्यात आला आहे.



### अभिनय

सौरभ शुक्ला, रणवीर शौरी, सीमा बिस्वास, शीबा चड्ढा, गोविंद नामदेव, सुशांत सिंग असे सर्व दमदार कलाकार या सीरिजमध्ये असून सुध्दा सीरिजचा प्रभाव निर्माण होत नाही. हे सर्व जेष्ठ कलाकार तसेच शीबा चड्ढा, सई तम्हाणकर यांनी आपापल्या व्यक्तिरेखा खूप प्रामाणिकपणे साकार केल्या आहेत. परंतु कमकुवत पटकथा आणि कमकुवत दिग्दर्शन यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखा उठून आलेल्या नाहीत.

या सर्व कमतरता असतानाही टाइमपास म्हणून बिंदिया के बाहुबली ही सीरिज बघायला हरकत नाही.

**वेबसीरिज:** बिंदिया के बाहुबली, **लेखक-दिग्दर्शक:** अमित कुमार, **कलाकार:** सौरभ शुक्ला, रणवीर शौरी, सीमा बिस्वास, शीबा चड्ढा, गोविंद नामदेव, सुशांत सिंग आणि सई तम्हाणकर, **ओटीटी प्लॅटफॉर्म:** ॲमेझॉन एमएक्स प्लेअर, **रेटिंग:** २.५/५

# आई चप्पलने मारत असे...




आपल्या गाण्यामध्ये उत्तर - बिहार लुटणारी अभिनेत्री शिल्पा शेट्टी, आपली बहीण शमिता शेट्टी तसेच हुमा कुरेशी आणि तिचा भाऊ अभिनेता साकिब सलीम हे कलाकार रक्षाबंधनाच्या निमित्ताने कपिल शर्माच्या शोमध्ये सहभागी झाले होते. यावेळी शिल्पा शेट्टीने आपली लहान बहीण शमिता शेट्टीच्या बालपणाचा एक मजेदार किस्सा प्रेक्षकांसह शेअर केला. शिल्पाने सांगितले की, आमची आई सुनंदा शेट्टी आम्ही दोघी बहिणी लहान असताना आमच्याशी कधी कधी कठोरपणे वागत असे, जेणेकरून आम्हाला शिस्त लागावी. अन्य मम्मींप्रमाणे ती कोमल मनाची नव्हती. आम्ही काही चूक केली, खासकरून शमिताने काही चूक केली की, आई चप्पल आणि झाडूने तिला मारत असे.

# उदयपूर फाइल्सच्या निर्मात्याला धमक्या




अनेक वादविवादानंतर अभिनेता विजय राजची केंद्रीय भूमिका असलेला उदयपूर फाइल्स हा सिनेमा अखेर येत्या ८ ऑगस्टला चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या सिनेमावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. राजस्थानच्या उदयपूर येथील टेलर कन्हैया लाल याच्या हत्येवर आधारित या सिनेमाचे निर्माता अमित जानी यांच्यामते चित्रपट प्रदर्शित झाल्यावर त्यांना सातत्याने फोनवर मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. एक्सशी बोलताना त्यांनी सांगितले की, त्यांना एका नंबरवरून सतत फोन येत असून फोन करणारी व्यक्ती जानींना जीवे मारण्याची धमकी देत आहे. अमित जानींनी ट्वीट केले आहे की, एका नंबरवरून त्यांना सतत बॉम्बने उडवण्याच्या आणि गोळी मारण्याच्या धमक्या मिळत असून शिव्या दिल्या जात आहेत. सदर व्यक्ती स्वतःला बिहारचा असल्याचे सांगत असून आपले नाव तबरेज असल्याचे तो सांगतो. या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करून त्याला अटक करावी अशी मागणी अमित जानी करत आहेत. सिनेमाचा मुद्दा कोर्टामध्ये असताना अमित जानींना केंद्र सरकारने दिल्ली आणि उत्तर प्रदेशमध्ये 'Y' श्रेणीची सशस्त्र सुरक्षा देण्यात आली होती.

# आमिरने एक वर्ष मला खोलीमध्ये कोंडले होते



परफेक्शनिस्ट आमिर खानचा अभिनेता भाऊ फैजल खानचे आपल्या भावाशी, आमिरशी, गेल्या अनेक काळापासून चांगले संबंध नाहीत. फैसलने आपल्या कुटुंबाविरोधात कायदेशीर लढा देखील दिला होता. फैजल आपल्या कुटुंबापासून वेगळा राहतो. आता फैजल ने एका मुलाखतीमध्ये आमिर आपल्यासह कसा वागत असे याविषयी खुलासा केला आहे. त्याने सांगितले की, आमिरने मला आमच्या मुंबईतील घरामध्ये एका वर्षापेक्षा अधिक काळ कोंडून ठेवले होते. माझ्या कुटुंबाचे मत होते की, मला स्किझोफ्रेनिया हा मानसिक आजार झाला आहे आणि मी एक वेडा माणूस आहे, ज्यामुळे समजाला नुकसान होऊ शकते.

हेल्दी Me

# समस्या एव्हीएमची

बॉलीवूडचा सुपरस्टार सलमान खानने अलीकडेच द ग्रेट इंडियन कपिल शो मध्ये आपल्या आरोग्याशी संबंधित गंभीर समस्यांबद्दल खुलासा केला. त्यानुसार ट्रायजेमिनल न्युराल्जिया, ब्रेन ॲन्युरिझम आणि आर्टेरिओव्हेनस मॅलफॉर्मेशन (एव्हीएम) या समस्यांचा सामना तो करत आहे. २०२४ मधील एका सार्वजनिक कार्यक्रमातील त्याच्या थकलेल्या अवस्थेतील व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यांच्या आरोग्याबद्दल अनेक तर्कवितर्क रंगले होते. नेटफ्लिक्सवरील शो वर सलमान हलक्याफुलक्या गप्पांऐवजी आरोग्य समस्यांबद्दलच अधिक बोलताना दिसला. साठीसमीप असूनही इतक्या समस्यांसह मी चालतोय, काम करतोय हीच बाब खूप मोठी आहे, असे त्याचे म्हणणे आहे. अर्थातच, हे त्रास काही साधे नाहीत. विशेषतः एव्हीएम ही अतिशय गुंतागुंतीची व गंभीर स्थिती आहे.

ब्रेन एन्युरिझम म्हणजे मेंदूमधील रक्तवाहिनीत एखाद्या ठिकाणी कमकुवतपणा येऊन तिथे फुगवटा तयार होतो. हा फुगवटा जर खूप मोठा झाला आणि फुटला, तर मेंदूत रक्तस्राव होऊन जीवघेणी परिस्थिती निर्माण होऊ शकते.


आर्टेरियोव्हेनस मालफॉर्मेशन अर्थात एव्हीएम म्हणजे रक्तवाहिन्यांच्या संरचनेतील एक दोष. यात धमन्या थेट शिरांशी जोडलेल्या असतात आणि मध्ये असणाऱ्या लहान रक्तवाहिन्यांचे जाळं नसतं. त्यामुळे रक्तप्रवाह बिघडतो आणि आजूबाजूच्या पेशींना नुकसान होऊ शकतं. शरीरातील सामान्य रक्तप्रवाहाची व ऑक्सिजन पोहोचण्याची प्रक्रिया बिघडते.

सामान्यतः धमन्यांमधून ऑक्सिजनयुक्त रक्त शरीरात जातं आणि शिरांमधून ऑक्सिजनरहित रक्त पुन्हा हृदयाकडे परत जातं. पण एव्हीएममुळे ऑक्सिजन टिशूंमध्ये पोहोचत नाही. साहजिकच, यामुळे मेंदूतील पेशींचे नुकसान तरी होते किंवा त्या मरण पावतात.

एव्हीएम हा बहुतेक वेळा जन्मजात असतो; पण लक्षणं उशिरा दिसतात. सर्वसाधारणपणे मेंदू किंवा पाठीच्या कण्यामध्ये सामान्यतः तो आढळतो. परंतु शरीराच्या कोणत्याही भागात होऊ शकतो. कधीकधी ही स्थिती इतर उपचारांदरम्यान किंवा मृत्यूनंतर पोस्टमॉर्टेममध्येच लक्षात येते. पण जर लक्षणं दिसू लागली, तर ती अत्यंत तीव्र आणि जीवघेणी ठरू शकतात. एव्हीएमची लक्षणे सर्व रुग्णांना जाणवत नाहीत. तरीही आकडी येणे, तीव्र किंवा सतत डोकेदुखी (कधी कधी मायग्रेनसदृश), दृष्टिदोष, स्नायू कमकुवतपणा किंवा अंगाचे अधुपणा, मुंग्या येणे, सुन्नपणा, बोलण्यात किंवा समजण्यात अडचण, स्मरणशक्ती कमी होणे, भ्रम होणे, चालण्यात असमर्थता, चक्कर येणे, बेशुद्ध पडणे, मानसिक कार्यक्षमता घटणे यांसारखी लक्षणे यामध्ये दिसतात.

एव्हीएम फुटल्यास मेंदूत रक्तस्राव होऊ शकतो. यामुळे पक्षाघात, मेंदूचं कायमचं नुकसान किंवा मृत्यू होऊ शकतो. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्युरॉलॉजीकल डिसऑर्डर्स ॲंड स्ट्रोकनुसार, एव्हीएममध्ये सर्वात मोठा धोका रक्तस्रावाचाच असतो. कारण या गुंत्यातील रक्तवाहिन्यांची भिंत अतिशय नाजूक व कमकुवत असते. ती उच्च दाबामुळे फुटू शकते. वारंवार सूक्ष्म रक्तस्राव झाल्यास मेंदूचं हळूहळू नुकसान होऊ शकतं आणि डिमेन्शिया वाढू शकतो.

एकदा रक्तस्राव झाला, तर पुढील वर्षभरात पुन्हा होण्याची शक्यता अधिक असते. याशिवाय, मोठ्या एव्हीएमचा मेंदूच्या शेजारच्या भागांवर दाब येतो. यामुळे हायड्रोसिफॉल्स, मेंदूतील दाब वाढणे आणि इतर समस्या निर्माण होतात.



व्याधीचिकित्सा

## एव्हीएमचे निदान कसे होते?

✻ यासाठी इमेजिंग तंत्रांचा वापर होतो.

✻ सेरेब्रल ॲंजिओग्राफीही यासाठी सर्वोत्कृष्ट ठरते. एमआरआय किंवा एमआरएमध्ये मेंदूचे नकाशे आणि रक्तप्रवाह याबाबत स्पष्टता येते. सीटी स्कॅन रक्तस्राव ओळखण्यात उपयुक्त ठरते. कधी कधी कानाजवळ व्हूऽऽश असा आवाज येत असल्यास ते एव्हीएमचे लक्षण असू शकते. योग्य निदान आणि काळजी घेतल्यास एव्हीएम असलेले रुग्ण सामान्य आयुष्य जगू शकतात. पण जर एव्हीम फुटले किंवा त्यामुळे आकडी आली, तर धोका मोठा असतो. त्यामुळे नियमित निरीक्षण आणि न्यूरोलॉजिकल तपासणी अत्यावश्यक असते.

## हेल्दी टिप्स




यकृताचे कार्य व्यवस्थित चालण्याकरिता कारल्यातील औषधी घटकांचा उपयोग होतो. यकृतात विविध कारणांमुळे जी विषद्रव्ये साठलेली असतात ती नष्ट करण्याचे काम कारल्यामुळे केले जाते. कारल्यामुळे शरीरातील चरबी वाढण्याचा धोकाही कमी होतो. तसेच हृदयाच्या आरोग्याकरिताही कारल्याचा उपयोग होतो. अपचनाच्या तक्रारी, काविळ यावरही कारले उपयुक्त ठरते.



सॅंडविचमध्ये किंवा वडापावमध्ये चटणीसाठी वापरण्यात येणारा पुदिना आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक असतो. पुदिनाची पाने चावल्यास अथवा बारीक करून दात घासल्यास श्वासदुर्गंधीपासून सुटका मिळते. सर्दीपासून आराम मिळण्यासाठीही याच्या पानांचा मोठा उपयोग होतो. आले, लसूण आणि पुदिना घालून तयार केलेली चटणी नियमित खावी, असे आयुर्वेदतज्ज्ञ सांगतात. काविळीतही ही चटणी खाणे फायदेशीर असते. रक्तदाब नियंत्रित करण्यासोबतच संधीवात आणि पचनासंबंधी रोगांवर पुदीना प्रभावी ठरतो.

# ऑईल पुलिंग फायदेशीर; पण...

अलीकडील काळात समाजमाध्यमे ही डॉक्टरांपेक्षा अधिक प्रभावी बनली आहेत. अनेक जण या माध्यमांमधून फिरणारे वैद्यकीय उपचार, प्रतिबंधात्मक उपचार कसलीही शहानिशा



हेल्थ स्टडी

न करता करत असतात. बहुतांश वेळा यातील 'उपचारांचे' किंवा 'क्रियांचे' किंवा अन्नघटकांचे फायदे हे शास्त्रीयदृष्ट्या एक तर पूर्ण चुकीचे किंवा अर्धसत्य असतात. यापैकीच एक प्रकार म्हणजे ऑईल पुलिंग.

दातांच्या समस्यांवर, जिंजिव्हायटिससारख्या हिरड्यांच्या समस्यांवर आणि एकूणच मौखिक आरोग्यासाठी खोबरेल तेल किंवा मोहरीच्या तेलाचे 'ऑईल पुलिंग' हा रामबाण उपाय असल्याचा दावा करणारे काही व्हिडिओज समाजमाध्यमांवर दिसून येतात.

ऑईल पुलिंग केल्याने तोंडाची स्वच्छता होऊ शकते; पण फक्त त्याच्या वापराने जिंजिव्हायटिससारखा आजार पूर्णपणे बरा होतो, असा कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही. हिरड्यांच्या गंभीर आजारांवर योग्य दंतवैद्यकीय तपासणी आणि औषधोपचार आवश्यकच आहेत.

जिंजिव्हायटिस म्हणजे हिरड्यांवर येणारी सूज जी प्रामुख्याने बॅक्टेरियल संसर्गामुळे होते. यामध्ये हिरड्या फुगतात, लाल होतात आणि दुखतात, पण सुरुवातीच्या अवस्थेत हा आजार दातांना आधार देणाऱ्या पेशी व हाडांवर परिणाम करत नाही. पण योग्य उपचार न केल्यास जिंजिव्हायटिस वाढत जाऊन दातांच्या मुळांवर परिणाम करू शकतो. यामुळे दात हलू लागतात.

खोबरेल तेलामध्ये मध्यम साखळी असलेल टी ॲसिडस् (एम.सी.एफ.ए.) असतात. यातील लॉरिक ॲसिडमध्ये जंतूनाशक आणि सूज कमी करणारे गुणधर्म असतात. ते स्ट्रेप्टोकोकस म्युटन्स आणि कॅंडिडा अल्बिकन्ससारख्या हानिकारक जंतूंवर प्रभावी आहे.

ऑईल पुलिंग ही आयुर्वेदामधील पारंपरिक पद्धत आहे. यात तोंडात तेल घेऊन ते काही वेळ सवयीने फिरवले जाते. यामुळे हिरड्यांची सूज, रक्तस्राव, दुर्गंधी यामध्ये काही प्रमाणात सुधारणा होऊ शकते. पण कोणत्याही वैज्ञानिक अभ्यासाने असा दावा केलेला नाही की केवळ या उपचाराने जिंजिव्हायटिस पूर्णपणे बरा होतो. सबब ही क्रिया दंतवैद्यांच्या सल्ल्याने पूरक उपाय म्हणून करता येईल.

**(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)**

# दुर्मीळ अनुवंशिक आजार

*मुलांमध्ये आढळणाऱ्या दुर्मीळ अनुवंशिक विकारांपैकी एक म्हणजे म्युकोपॉलीसॅकरायडोसिस (एमपीएस). हा विकार शरीरातील पेशींमध्ये विशिष्ट प्रकारच्या साखरेसारख्या पदार्थांचा संचय झाल्यामुळे होतो. ग्लायकोसामिनोग्लायकन्स (जीएजी) या संयुगाचे अपघटन करणारे एन्झाइम शरीरात नसल्यामुळे ही साखर पेशींमध्ये साठत जाते आणि त्यामुळे शरीरातील विविध अवयवांवर विपरीत परिणाम होतो.*

एमपीएस हा जनुकांमधील दोषांमुळे होणारा विकार आहे. एमपीएसचे एकूण सात प्रकार असून लक्षणांची तीव्रता आणि स्वरूप प्रकारावर अवलंबून असते. परंतु काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे असतात.

चेहऱ्याच्या रचनेत अनियमितता. म्हणजेच मोठे कपाळ, जाड ओठ, नाक फुगलेले दिसणे इत्यादी. मॅक्रोग्लोशिया म्हणजेच जीभेचा आकार मोठा असणे.

- हाडांची वाढ प्रमाणात न होणे.
- सांधेदुखी व हालचालींमध्ये मर्यादा येणे.
- वारंवार होणारे श्वसनाचे त्रास
- बुद्धिमत्तेतील घट किंवा मानसिक विकास खुंटणे.
- कानांचे विकार, श्रवणशक्ती कमी होणे
- यकृत व प्लीहा मोठी होणे
- कॉर्नियल क्लाउडिंग
- हृदयाच्या झडपा जाड होणे

**निदान कसे होते? :** एमपीएसचे निदान करण्यासाठी काही चाचण्या केल्या जातात.


**युरिन टेस्ट** : लघवीतील जीएजी (ग्लायकोसामिनोग्लायकन्स) मोजणे

**एन्झाइम ॲक्टिव्हिटी तपासणे** : यामध्ये विशिष्ट एन्झाइमची कार्यक्षमता तपासली जाते. **जनुक चाचणी (डीएनए तपासणी)**: कोणत्या जनुकात दोष आहे हे ओळखण्यासाठी **इमेजिंग (एक्स-रे, एम आरआय)** : हाडे, मेंदू इत्यादींच्या स्थितीचे परीक्षण



**उपचारांचे काय? :** सध्या एमपीएस हा पूर्णपणे बरा होणारा रोग नाही. पण काही उपचारांमुळे लक्षणांवर नियंत्रण ठेवता येते आणि जीवनमान सुधारता येते. उदाहरणार्थ, एन्झाइम रिप्लेसमेंट थेरपी (ईआरटी) या पद्धतीत शरीरात कमतरता असणारे एन्झाइम बाहेरून दिले जाते. हा उपचार नियमितपणे आयव्ही मार्गाने दिला जातो. श्वसनाचा त्रास असल्यास ॲडेनॉइड/टॉन्सिल काढणे (ॲडेनोटॉन्सिलेक्टोमी) केली जाते; पण यामध्ये धोका अधिक असतो. हृदय, डोळे, कान इत्यादींसाठी स्वतंत्र तज्ज्ञांद्वारे उपचार केले जातात. एमपीएस असलेल्या मुलांना सामान्य शस्त्रक्रिया देखील धोकादायक ठरू शकतात. विशेषतः टॉन्सिल व ॲडेनॉइड काढण्याच्या शस्त्रक्रियेनंतर अनेकांना श्वसनाचा धोका, ॲनस्थेशियाच्या गुंतागुंती, रक्तस्राव असे त्रास होऊ शकतात. त्यामुळे अशा रुग्णांवर अनुभव असलेल्या रुग्णालयातच उपचार होणे आवश्यक असते.

# नवाकाळ शब्दकोडे-१३३९



**आडवे शब्द –** २. वाचाळ, उगाच बडबड करणारा ५. गाढव, लंबकर्ण ९. समुद्राकाठचे कांदळवन, या झाडांमुळे जमिनीची धूप थांबते. ११. श्रीकृष्णाने उचललेला पर्वत १२. देवालय १४. वायू १५. लांब पल्ल्याची तलवार १६. वादात समोरच्याचा मुद्दा खोडून काढणे १७. सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा १८. दूध पूर्ण आटवून केलेला पदार्थ २०. पाणी प्यायचे छोटे भांडे २३. सोंगटी २४. सोय, व्यवस्था २७. गुंडाळणे २९. खास पाहुणचार ३२. क्षुद्र इसम ३५. नांगर ३७. उषःकाल ३९. वंचित ४०. दारू ४१. कंडी, अफवा ४२. चोळीचे कापड ४३. गर्दीत जमलेले प्रेक्षक ४५. देवांचा राजा ४७. अंकित, अधीन ४९. सोन्याची शुद्धता ५१. दात ५३. व्यय ५४. ग्रहमालेचा जनक, सूर्य ५६. कमळांचे तळे ५८. पवित्र ६०. एक चतुर्थांश ६१. निद्रा, झोप ६३. हिमालयाची कन्या पार्वती ६४. सडेतोड ६६. शेतीवाडी, गुरेढोरे वगैरे मालमत्ता ६८. चिंचोळा, आकुंचन पावलेला कोते विचार असलेला ७०. ऊन ७२. पूर्ण विध्वंस, जळून खाक ७३. आनंदाने केलेला जल्लोष ७४. मीठ, नमक ७५. नारळाची करवंटी ७७. व्यवस्थित ७८. रस्ता वापरण्याचे शुल्क, टोल ८०. फजिती ८१. बदल ८२. शक्तिशाली ८४. मोकळा, स्वतंत्र ८५. ख्रिस्ती धर्मियांचा प्रमुख धर्मगुरू ८७. धार्मिक व्रत ८८. दक्षता ८९. शुक्राचार्यांना अवगत विद्या ९१. कूटप्रश्न, कोडे ९३. हस्त ९४. मोकळीक ९५. रमलेला ९७. तराजूचा प्रकार १००. पती १०२. सहाचा समूह १०३. स्तुतीस्तोत्र १०५. बहकणे, वाहवत जाणे १०६. जनक १०७. मस्तकाचे रक्षण करणारी वस्तू १०८. राजाचा लेखनिक १०८. गुंड

**उभे शब्द –** १. सर्वत्र, इकडेतिकडे २. म्हातारपण ३. जंगल ४. संन्याशाचे जलपात्र ५. शत्रुत्व ६. खांदा व हात जोडणारा सांधा ७. मग, मागाहून ८. हातचलाखीची जादू ९. खूप खाणारा १०. रडगाणे १३. दिवस १७. निर्धन १९. मार्गक्रमण २१. लहान मुलींची कर्णभूषणे २२. पडदा २३. रथ हाकणे २५. जुन्या कपड्याचा तुकडा, फडके २६. खात्रीपूर्वक, नक्की २८. पोशाख ३०. मासे पकडण्याचे मोठे जाळे ३१. आस, इच्छा ३३. पहारेकरी, राखणदार ३४. पिवळ्या फुलांचा वृक्ष, बहावा ३६. मौखिक प्रसिद्धी ३८. आंघोळीचे पसरट पात्र ४२. ढीग, ढिगारा ४४. परीघ, बाह्यरेषा ४६. अधाशीपणा, अतृप्ती ४८. संवत्सर, वर्ष ४९. टिंगल, थट्टा ५०. पतित ५२. सागर ५५. दही व फळभाज्यांचे तोंडीलावणे ५७. निर्विकार चेहरा ५८. पचायला जड खाद्यतेल ५९. वस्तू ६०. डोळ्याच्या उघड्या भागावरील पारदर्शक आवरण ६२. मोठे तालवाद्य ६३. फायद्याचे, कल्याणकारी ६४. अब्रू ६५. कोवळी फांदी ६७. राखणदार, रक्षक ६८. प्रतिपाळ, पालनपोषण ६९. हुलगे ७०. शपथ ७१. दळलेली साखर ७४. शरम, लाज ७६. बकबक ७९. कांद्याचे बी ८०. केवळ ८२. चलती, अनुकूल काळ ८३. पंढरपूरची पायी यात्रा ८४. गुमास्ता, दिवाणजी ८५. न्याहारीतला लोकप्रिय पदार्थ ८६. टेंभा, दिवटी, मशाल ८९. बोलणे, संवाद ९०. अवांतर, बाकीचे ९१. ओंकार ९२. रात्री चमकणारा किडा ९६. शिक्षक, गुरुजी ९८. स्तुती, कौतुक ९९. गणपती १००. पत्नी १०१. भेग, फट १०४. अभिनेता •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३८चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. अगडबंब ५. श्वासनलिका ९. पंचारती ११. साजिंदा १२. दूरस्थ १३. मत १४. मिथक १७. काकडी १८. उग्र १९. पनीर २१. फार २३. दीन २४. सुलभ २५. मेद २६. कारागीर २८. लव ३०. वचपा ३१. यदा ३३. कलप ३५. रणभेरी ३६. शशिकला ३८. रीठ ४०. खडा ४२. चौथरा ४३. लाट ४५. कमलाकर ४७. डंका ४८. गिरी ५०. कनवट ५४. रमणी ५७. ज्वर ५८. वाढ ५९. जंगलराज ६०. जून ६१. दरवळ ६३. बंगला ६४. कौपीन ६६. नवार ६८. आदिम ७०. माल ७१. कामसू ७३. सडक ७५. गुदस्त ७६. वारकरी ७७. सारण ७८. वारू ७९. रंध्र ८०. पाटव ८१. चकोर ८२. काम ८४. कंडी ८५. वशीकरण ८७. वक्र ८८. सबब ९०. खंजीर ९१. जोर ९२. पाट ९३. गोल ९४. क्षीरसागर ९५. पात्रता ९७. वमन १००. ढास १०१. शैल १०२. रमणीय १०४. मालक १०६. लवलाही १०७. वरकस १०८. तडकाफडकी

**उभे शब्द :** १.अजिंक्य २. गदा ३. बंदूक ४. बरडी सुपारी ६. समग्र ७. नत ८. कामिनी ९. पंक १०. रक्षा १५. थरकाप १६. कारभारीण १७. कानवला १८. उभय १९. पदक २०. भगीरथ २२. कलश २७. रणरागिणी २९. वशिला ३२. दाखला ३४. लस्सी ३७. कटक ३९. ठक ४१. डाकबंगला ४२. चौकार ४४. शैव ४६. मट्ठ ४९. प्रज्वलन ५१. नजर ५२. टवाळ ५३. चुराडा ५५. मद्यपी ५६. पुनर्वसू ५९. जंगम ६१. दरड ६२. वक्र ६३. बंदिस्त ६४. कौल ६५. नकार ६७. वासरू ६८. आदबशीर ६९. आरव ७०. मारीच ७२. मणका ७४. करंडी ७६. वाटण ७७. सारवट ७८. वाकडा ८०. पारपत्र ८३. मफलर ८४. कंबर ८५. वजीर ८६. पुरवणी ८९. बक्षीस ९०. खंगलेला ९२. पान ९५. पालव ९६. तारक ९८. मयत ९९. तलफ १००. ढाका १०३. मस १०४. माका १०५. कड

# कबुतरांना खायला घालणारच! जैन आक्रमक! मुनींचा इशारा

पान १ वरून

महापालिकेकडे सकाळी ६ ते ८ या वेळेत कबुतरांना धान्य घालण्याची परवानगी मागितली असून, मौखिक परवानगी मिळाल्याचा दावाही फलकावर करण्यात आला आहे. मात्र, ती अद्याप लेखी स्वरूपात मिळालेली नाही. त्यामुळे ट्रस्टने उच्च न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान राखत नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. न्यायालयाने मनाई करूनही कबुतरांना खाद्य देण्यासाठी लोक येत असल्याने आज दादरच्या कबुतरखाना परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला. स्थानिक पोलिसांसह दंगल नियंत्रण पथक तैनात करण्यात आले. संपूर्ण परिसर बॅरिकेडिंग करून कुणालाही आत प्रवेश होऊ नये, याची खबरदारी घेण्यात आली होती. गिरगाव चौपाटीला आज कबुतरांची संख्या वाढली आहे. गिरगाव चौपाटीवर एका व्यक्तीने महापालिका कर्मचाऱ्यांसमोर कबुतरांना खाद्य दिले. महापालिका कर्मचाऱ्यांनी या व्यक्तीला ५०० रुपये दंड आकारला. त्यानंतर त्यांनी आपली चूक मान्य करून पुन्हा असे न करण्याचे आश्वासन दिले. गिरगाव येथे पोलिसांनी कबुतरांना दाणे टाकणाऱ्यांना ८,००० रुपयांचा दंड ठोठावला. कबुतरखान्याच्या वादावर प्रतिक्रिया देताना आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, पोलीस त्यांची कारवाई करत आहेत. कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन चुकीचे आहे. मोटारीवरून कबुतराला दाणे देणाऱ्याविरोधातही आरटीओही कारवाई करत आहेत.

# एकनाथ शिंदे श्रीनगरला सैनिकांसाठी रक्तदान केले

पान १ वरून

स्वतः रक्तदान केले.

सांगलीतील शिवसेनेचे चंद्रहार पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित या यात्रेत एक हजार पैलवानांनी श्रीनगरला जाऊन रक्तदान केले. शिंदे यांनीही रक्तदान केले.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत पावलेल्या स्थानिक सय्यद आदिल हुसेन शाह यांच्या कुटुंबाने शिंदे यांची भेट घेतली. दहशतवाद्यांनी हल्ला केला तेव्हा काही पर्यटकांना वाचविण्यासाठी त्याने दहशतवाद्याच्या हातातील बंदुक हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र यात त्याला जीव गमवावा लागला. यावेळी हुसेन कुटुंबाने सांगितले की, सय्यद आदिल हुसेनचा मृत्यू झाला त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी कुटुंबाला धीर दिला. सर्वात आधी त्यांनीच आमची भेट घेतली आणि मदत केली. एवढेच नाहीतर त्यांनी आम्हाला घर बांधून दिले. त्यांनी आमची साथ दिली त्यासाठी आम्ही त्यांचे आभार मानतो.

# ६५ जागांवर विजयी करून देतो आता संजय राऊतांचा गौप्यस्फोट

पान १ वरून

लोकसभेत आम्ही १०० टक्के विजय मिळवू, अशी आम्हाला खात्री होती आणि महाराष्ट्रात आम्ही खरोखर ते यश मिळवले. त्यामुळे अशा प्रकारे गैरमार्गाने विजय मिळवण्याची आम्हाला गरज नव्हती. विधानसभा निवडणुकीपूर्वी हेच लोक पुन्हा आमच्याकडे आले. ते म्हणाले, तुमच्या ६० ते ६५ अडचणीच्या जागा सांगा. त्या आम्ही ईव्हीएमच्या माध्यमातून जिंकून देऊ. आम्ही पुन्हा नकार दिला. मात्र त्यांनी इतकेही सांगितले की, तुम्हाला जरी ही मदत नको असली तरी सत्तेत असलेले लोक ईव्हीएम आणि मतदारयादीत फेरफार करून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे तुमचे अपयश आम्हाला दिसते, म्हणून आम्ही मदत करू शकतो. तरीही आमचा विश्वास निवडणूक यंत्रणा, निवडणूक आयोग आणि लोकशाहीवरच राहिला. पण आता राहुल गांधी यांनी जे पुरावे सादर केले आहेत, त्याची चौकशी होणे आवश्यक आहे.

धनखड यांना हाऊस अरेस्ट केले?

संजय राऊत म्हणाले की, जगदीप धनखड यांनी २१ जुलै रोजी उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला. तेव्हापासून ते कोणाच्याही संपर्कात नाहीत. त्यांची प्रकृती कशी आहे? ते बरे आहेत ना? मुळात ते आहेत तरी ना? याची माहिती आम्हाला हवी आहे. दिल्लीच्या राजकीय वर्तुळात त्यांना त्यांच्या राहत्या घरी हाऊस अरेस्ट केल्याची चर्चा असून ती खरी वाटते. आपल्याला नको असलेले विरोधक गायब करणे, तुरुंगात डांबणे ही पद्धत चीन आणि रशियासारख्या कम्युनिस्ट देशांत आहे. भाजपाचे भीष्म पितामह लालकृष्ण अडवाणी यांनाही अशाच प्रकारे गप्प केले गेले.

# ईपीएफओमधून पैसे काढायचेत? कार्ड आहे ना!

**कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना म्हणजेच ईपीएफओने पुढील वर्षापासून आपल्या खातेदारांना एटीएममधील ईपीएफओ खात्यातून थेट पैसे काढण्याची सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत क्लिष्ट विभागीय प्रक्रिया आणि लाल फितीमुळे कर्मचार्यांना गरज पडेल तेव्हा पैसे काढण्यासाठी कार्यालयात जावे लागत होते. ताज्या निर्णयाद्वारे निधी काढण्यात विभागीय हस्तक्षेप कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.**

सध्या ईपीएफओच्या पैसे काढण्याच्या प्रक्रियेला विलंब झाल्यामुळे खातेदारांना बराच काळ प्रतीक्षा करावी लागते. बर्याच कालावधीनंतर गरजूंच्या खात्यात आवश्यक रक्कम पोहोचते. पीएफ काढण्याच्या कार्डमुळे लालफितशाही हद्दपार होणार आहे. याला ईपीएफओ विथड्रॉवल कार्ड म्हटले जाईल.

हे करत असताना एकूण रकमेच्या पन्नास टक्के रक्कम काढण्याची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. याद्वारे आर्थिक शिस्त जपण्याचाही प्रयत्न केला आहे. तसेच दीर्घकालीन बचत सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठीही हा निर्णय महत्त्वाचा आहे.

या नवीन सुविधेसाठी संस्थेने आपल्या खातेदारांना विशेष पीएफ कार्ड देण्याचा निर्णय घेतला असून ते बँकेच्या एटीएम कार्डप्रमाणे काम करेल.

खातेदार पुढील वर्षी जानेवारीपासून त्यांच्या कार्डद्वारे त्यांच्या खात्यातून थेट पैसे काढू शकतील. त्यामुळे पुढील वर्षीपासून पीएफ खात्यातील पैसे काढण्याच्या प्रक्रियेतील मानवी हस्तक्षेप दूर होणार आहे.

ग्राहक सुट्टीच्या दिवसातही २४ तास पैसे काढू शकतील. आपत्कालीन गरजांच्या वेळी ही सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

सध्या घर खरेदी, मुलांचे शिक्षण, लग्न, आजारपण यांसारख्या विशेष परिस्थितीत पीएफमधून ठराविक रक्कम काढण्याची तरतूद आहे. यात नोकरीचा कार्यकाळ आणि निश्चित रक्कम यांचाही समावेश आहे. त्याचप्रमाणे सेवानिवृत्तीच्या काही काळ आधी मोठी रक्कम काढण्याची सुविधा देखील समाविष्ट आहे.







केंद्र सरकार आपली सामाजिक जबाबदारी वाढवण्यासाठी अनेक महत्त्वाच्या योजनांवर काम करत आहे. यामध्ये गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे आणि या कामगारांना वैद्यकीय संरक्षण आणि पीएफ सुविधा प्रदान करणे समाविष्ट आहे. सध्या त्यांना पारंपरिक कर्मचारी पद्धतीचे फायदे मिळत नाहीत. इपीएफओ त्यांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

# जळगावात पावसाळी रानभाज्या महोत्सव

■ जळगाव

**जळगाव** येथे आज कृषी अधिकारी यांच्या कार्यालय परिसरात पावसाळी रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाला स्थानिक नागरिकांनी उत्फुर्त प्रतिसाद दिला.

या महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विविध शेतकरी गट व महिला बचत गटांना बाजारपेठ मिळाली असून नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे. प्रकल्प संचालक (आत्मा) जळगाव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, कृषी विज्ञान केंद्र जळगाव-पाल यांच्या संयुक्त विद्यमाने या रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात



पारंपरिक पद्धतीने पिकवलेल्या रानभाज्यांचे आणि प्रक्रिया उद्योगाचे ८० स्टॉल लावण्यात आले होते. नागरिकांनाही पावसाळी हंगामातील हा रानमेवा चाखण्याची संधी या निमित्ताने मिळाली.

# सांगलीत काँग्रेसला धक्का माजी नगरसेवक भाजपात

■ सांगली

**आगामी** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी बड्या नेत्यांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे पक्षांतर सुरू असून सर्व राजकीय पक्षांकडून ताकद वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आज भाजपाने पश्चिम महाराष्ट्रात महाविकास आघाडीला आणखी एक धक्का दिला. सांगलीतील काँग्रेसचे माजी नगरसेवक आणि सांगलीचे खासदार विशाल पाटील यांचे खंदे समर्थक असलेले मनोज सरगर यांनी काँग्रेसची साथ सोडली. ते उद्या भाजपात प्रवेश करणार आहेत. सांगलीतील संजयनगर भागात होणाऱ्या या पक्षप्रवेश सोहळ्यास भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. मनोज सरगर यांच्या प्रवेशामुळे सांगली महापालिका निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला आणि खासदार विशाल पाटील यांना मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

# आजपासून देशातील ११ राज्यांत अतिमुसळधार पाऊस बरसणार

पान १ वरून

आला आहे. महाराष्ट्रासाठी आगामी काही दिवसांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, १२ ऑगस्ट रोजी बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. १३ ऑगस्टला हा कमी दाबाचा पट्टा आणखी मजबूत होईल. सध्याची वातावरणीय परिस्थिती या प्रणालीला पूर्णपणे अनुकूल आहे. यामुळे देशभरातील विविध भागांमध्ये पावसाची तीव्रता वाढेल आणि अनेक ठिकाणी अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

सध्या भारताच्या उत्तर, पश्चिम, मध्य आणि काही दक्षिणेकडील भागांमध्ये मान्सूनचा वेग कमी झाला आहे. या हवामान बदलाचा परिणाम म्हणून महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या ११ राज्यांना हवामान खात्याने हाय अलर्ट दिला आहे. महाराष्ट्रातील कोकण, विदर्भ आणि मराठवाडा भागात १३ ते १५ ऑगस्टदरम्यान पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज स्कायमेटने व्यक्त केला आहे. शेतीसाठी हा पाऊस लाभदायक असला तरी काही ठिकाणी जलसाठा वाढल्याने नद्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते. अशा परिस्थितीमध्ये नागरिकांना योग्य ती सतर्कता बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पंढरपुरात हिंदीत पूजा झाल्याचा दावा

■ पंढरपूर

**पंढरपूरच्या** श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात हिंदीतून पूजा करण्यात आल्याचा दावा राहुल सातपुते या भाविकाने केला आहे. राहुल सातपुतेच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला गुरुजींनी पूजा सूचनांचे मार्गदर्शन मराठीत केले. मात्र, उपस्थित ३०-३५ कुटुंबांपैकी एका कुटुंबाने मराठी समजत नाही असे सांगितल्यावर गुरुजींनी लगेच संपूर्ण पूजा हिंदीत सुरू केली. यावर आक्षेप घेत सातपुतेने महाराष्ट्रात मराठीतच पूजा व्हावी अशी मागणी केली. परंतु, गुरुजींनी त्यावर सार्वजनिकरीत्या नाराजी व्यक्त करत समिती व सुरक्षा रक्षकांना बोलावले. समितीने सर्वांसाठी मराठी आणि एका कुटुंबासाठी हिंदी अशा मिश्र पद्धतीने पूजेचा प्रस्ताव दिला. पण शेवटी पूजा पूर्णपणे हिंदीतच पार पडली.

याबाबत मंदिर समितीचे राजेंद्र शेळके म्हणाले की, पंढरपूरच्या मंदिरात विठ्ठल आणि रुक्मिणीमातेची तुळशीपूजा होती. त्याचे सर्व स्त्रोत हे संस्कृत भाषेत असतात. मात्र तुळशीपूजा सुरू करण्यापूर्वी त्याची माहिती ही मराठी भाषेतून सांगितली जाते. परंतु ९ ऑगस्ट रोजी एक अमराठी कुटुंब आले होते. त्या कुटुंबाला आम्हाला याबाबतची माहिती हिंदी भाषेतून दिली जाईल का, अशी विचारणा केली होती. आपल्याकडे सर्व पूजा मराठीतूनच होतात. आपण हिंदी भाषेतून कुठलीही पूजा करत नाही. भाविकाला मराठी समजत नसल्यामुळे आपण फक्त पूजेची माहिती हिंदीतून दिली. राहुल सातपुते यांच्या तक्रारीची मंदिर समितीने गांभीर्याने दखल घेतली आहे. यापुढे मंदिरात मराठी भाषेतूनच पूजा केली जाईल.





नवाकाळ
• पुणे । सोमवार ११ ऑगस्ट, २०२५ • पान -८

# अंबाबाई मंदिराचे दर्शन दोन दिवस बंद राहणार



**कोल्हापूर -** कोल्हापूरच्या देवी अंबाबाईचे मूर्तीवर संवर्धन प्रक्रिया करण्यात येणार असल्याने सोमवार ११ ऑगस्ट आणि मंगळवार १२ ऑगस्ट हे दोन दिवस भाविकांसाठी दर्शन बंद राहणार आहे. या काळात भाविकांना देवीच्या उत्सवमूर्ती व श्रीकलशाचे दर्शन घेता येईल. अंबाबाईची मूर्ती सुस्थितीत राहावी यासाठी जिल्हाधिकारी व पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे प्रशासक अमोल येडगे यांनी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाला पाहणीसाठी बोलावले होते. पाहणीनंतर दोन दिवस आवश्यक नियमित संवर्धन प्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. देवस्थान समितीने भाविकांना पितळी उंबऱ्याच्या बाहेरून उत्सवमूर्ती व श्रीकलशाचे दर्शन घेण्याचे आणि सहकार्य करण्याचे आवाहन केले.



मालाडचा राजा



मुंबईचा सम्राट



मालवणीचा राजा

# चिकनगुनिया

### कारणे आणि संसर्गाचा मार्ग

चिकनगुनिया विषाणू एडीस मच्छरांमुळे पसरतो, जे एका संक्रमित व्यक्तीला दंश करून दुसऱ्या व्यक्तीला दंश करत हे मच्छर हा आजार पसरवतात. मच्छराच्या डंखामुळेच हा विषाणू शरीरात प्रवेश करतो आणि रक्तवाहिन्यांद्वारे शरीराच्या इतर भागांमध्ये पसरतो.

**चिकनगुनिया हा एक विषाणूजन्य संसर्गजन्य रोग आहे जो एडीस मच्छरांच्या माध्यमातून पसरतो. याचा प्राथमिक स्त्रोत एडीस इजिप्टी मच्छर असतो, जो मुख्यत: दिवसभरात अंडी घालतो. चिकनगुनियाचे विषाणू मुख्यत: रक्तात प्रवेश करतो. हा रोग मुख्यत: उष्णकटिबंधीय क्षेत्रांमध्ये जसे की भारत, आफ्रिका, आशिया आणि दक्षिण अमेरिका येथे आढळतो.**


### चिकनगुनिया संसर्गाची लक्षणे

साधारणत: मच्छरदंश झाल्यानंतर ४ ते ८ दिवसांच्या अंतराने लक्षणे दिसून येतात. अंगावर सूज, सर्दी, आणि ताप येतो. सांध्यांमध्ये तीव्र वेदना व सूज येणे हे या आजाराचे विशेष लक्षण आहे.

१. ताप : शंभरच्यावर ताप येतो , ताप अचानक येतो आणि तो काही दिवस राहतो .

२. संधिवात: सर्वात महत्त्वाचे आणि वेदनादायक लक्षण म्हणजे संधीवात झाल्याप्रमाणे तीव्र वेदना, ज्यामुळे व्यक्तीला चालायला व बसायला त्रास होतो.

३. सर्दी व अंगदुखी : अंग दुखणे, मणक्याजवळ, गुडघ्यात आणि हाडांच्या



भागात दुखते व सर्दीही होते

४. चक्कर व थकवा: चक्कर येणे, कमजोरी आणि थकवा जाणवू शकतो.

५. लघवीत बदल: काही व्यक्तींना लघवी कमी होणे व लघवीच्या इतर समस्या होऊ शकतात.

चिकनगुनियाचा उपचार (हे उपचार डॉक्टरांना विचारल्याशिवाय करू नयेत) चिकनगुनियासाठी सध्याच्या टप्प्यावर विशिष्ट उपचार उपलब्ध नाहीत. यासाठी मुख्यत: लक्षणांवर उपचार केले जातात. ताप, संधिवात आणि अंगदुखी यावर वेदनाशामक औषधे दिली जातात. विश्रांती घेणे, पाणी पुरेसे पिणे आणि योग्य आहार घेणे गरजेचे आहे.




# नागपूर-पुणे अवघ्या १२ तासांत वंदे भारत एक्स्प्रेसचा शुभारंभ

■ नागपूर

**विदर्भ** आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या आणि पुणे-नागपूर अंतर केवळ १२ तासांत पार करणार्या नागपूर (अजनी)-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसचा आज शुभारंभ झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या एक्सप्रेसला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हिरवा झेंडा दाखवला. यावेळी नागपूर रेल्वे स्थानकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते.

महाराष्ट्राला मिळालेली ही बारावी वंदे भारत एक्स्प्रेस आहे. वर्धा ते मनमाडदरम्यान वंदे भारत सेवेपासून वंचित असलेल्या भागासाठी ही पहिलीच गाडी आहे. अजनी (नागपूर) ते पुणे असा ८८१ किलोमीटरचा प्रवास करणारी ही देशातील सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत एक्स्प्रेस ठरणार आहे. ही गाडी वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहमदनगर आणि दौंड कॉर्ड लाईनमार्गे धावेल. याबाबत फडणवीस म्हणाले, मी स्वतः रेल्वेमंत्र्यांना नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्याची विनंती केली होती. नागपूर-पुणे रस्ते मार्गावर प्रचंड ट्रॅफिक असल्याने यासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि



आज ही सेवा सुरू होत आहे. हा वंदे भारतचा सर्वात लांब पल्ल्याचा मार्ग असून प्रवाशांना वेगवान व सोयीस्कर प्रवासाचा लाभ मिळेल. सध्या नगरवरून ट्रेन दौंडला आणि नंतर पुण्याला जाते. नगर-पुणे थेट रेल्वेमार्गाचा प्रस्ताव दिला असून पुढील काळात त्यावर निर्णय होईल. तसेच, संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे या नव्या एक्स्प्रेसवेच्या बाजूने रेल्वेमार्ग बांधल्यास नागपूर-पुणे अंतर १०० किलोमीटरहून अधिकाने कमी होऊ शकते. यासाठी रेल्वेसोबत चर्चा सुरू आहे.

# भास्कर जाधवांचा स्टेटसवरून ब्राह्मण महासंघाला इशारा

■ मुंबई

**उबाठा** आमदार भास्कर जाधव यांनी आपल्या व्हॉट्सॲप स्टेटसवर गाण्याच्या ओळी टाकून ब्राह्मण महासंघाला अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. भिडा किती, तुम्ही नडा किती, द्या द्यायचा तेवढा त्रास, कितीही समोर येऊ द्या, त्यांना मी एकटा बास असा हे गाणे त्यांनी स्टेटसवर ठेवले आहे. त्यामुळे ब्राह्मण महासंघ आणि भास्कर जाधव यांच्यातील वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

गुहागर तालुक्यातील हेदवतड येथे लेखणीचा दहशतवाद संपवल्याचा दावा करत जाधव यांनी वादग्रस्त विधान केले होते. त्यावर गुहागर तालुका ब्राह्मण सहाय्यक संघ आक्रमक झाला. संघाने पत्र लिहून जाधव यांच्यावर स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी तालुक्यातील ऐक्याला बाधा आणल्याचा आरोप केला.

# नरेस, सुरेस, परेस! चड्डीत राहायचे संदीप देशपांडेंचा टी-शर्ट चर्चेत

■ मुंबई

**दादरमधील** कबुतरखाना बंद करण्याच्या मुद्द्यावरून सध्या मुंबईत जोरदार वाद रंगला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने शहरातील ५१ कबुतरखान्यांच्या परिसरात पक्षांना दाणे घालण्यास बंदी घालण्याचे आदेश दिले असतानाही, जैन समुदायातील काही व्यक्ती वेगवेगळ्या मार्गाने कबुतरांना दाणे घालत आहेत. या पार्श्वभूमीवर




मनसे नेते संदीप देशपांडे यांनी परिधान केलेला टी-शर्ट चर्चेचा विषय ठरला आहे. त्यांनी घातलेल्या टी-शर्टवर नरेस, सुरेस, परेस, चड्डीत राहायचे असा मजकूर लिहिलेला होता. हा टी-शर्ट घालून ते दादर परिसरात फिरत होते. हा संदेश म्हणजे मुंबईत राहूनही कायद्याला धाब्यावर बसवणाऱ्या अमराठी भाषिकांना अप्रत्यक्ष इशारा असल्याचे बोलले जात आहे.

# राहुल गांधींनी केलेल्या आरोपांची आयोगाने चौकशी करायला हवी!

**माजी मुख्य निवडणूक आयुक्तांचे परखड मत**

■ नवी दिल्ली

**काँग्रेसचे** नेते राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीतील बोगस मतदार प्रकरणावरून केंद्रीय निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. या आरोपांनंतर आयोगाकडून राहुल गांधींना अडचणीत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु माजी मुख्य निवडणूक आयुक्त ओ. पी.रावत यांनी राहुल गांधी यांना पाठिंबा दिला आहे. आयोगाने गांधींच्या आरोपांची तातडीने चौकशी करायला हवी, असे परखड मत रावत यांनी मांडले आहे.

ओ.पी.रावत यांनी म्हटले की, बंगळुरूतील कथित बोगस मतदारांबाबत राहुल गांधींनी केलेल्या आरोपांची निवडणूक आयोगाने चौकशी करायला हवी. त्यासाठी आयोगाने कोणत्याही तक्रारीची वाट न पाहता तपास सुरू करायला हवा. मी मुख्य निवडणूक आयुक्त असताना कोणत्याही पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी गंभीर आरोप केल्यास आम्ही तात्काळ स्वतःहून तपास सुरू करत होतो आणि जनतेसमोर सत्य ठेवत होतो.अशा प्रकरणांत आम्ही पक्षांकडून आधी तक्रार मागत नव्हतो.

दरम्यान,काँग्रेसने ८ ऑगस्ट रोजी बंगळुरूमध्ये या मुद्द्यावर आंदोलन केले. त्याचदिवशी सकाळी काही लोकांना मतदार यादी डाउनलोड करण्यात अडचणी आल्याने राहुल यांच्या आरोपांनंतर निवडणूक आयोगाने छेडछाड केली असल्याचा संशय व्यक्त झाला. मात्र, आयोगाने हे आरोप फेटाळले.

# वसई-विरार माजी आयुक्तांच्या चालकाची ४ मुलेही पालिकेत

**माहिती अधिकारांतर्गत माहिती उघड**

■ मुंबई

**वसई** विरारचे माजी आयुक्त अनिल पवार यांच्या चालकाचे चारही मुले पालिका कर्मचारी असल्याचे उघड झाले आहे. ही माहिती युसूफ अली बोहरा यांनी माहिती अधिकारांतर्गत मिळवली आहे. अनिल कुमार पवार यांची मनी लॉंड्रिंग प्रकरणी ईडीमार्फत त्यांच्या मालमत्तावर छापे टाकण्यात आले असून त्यांची चौकशी सुरू आहे. या नवीन माहितीमुळे माजी आयुक्तांचा नवा कारनामा उघड झाला आहे. बोहरा यांनी माजी मनपा आयुक्तांसह ठेकेदार कंपनीवरही कारवाईचीआरोप करून कारवाईची मागणी केली.

युसूफ अली बोहरा यांनी म्हटले आहे की, अनिल पवार यांनी खासगी वाहन चालक मधुकर राऊत यांच्या तीन मुली आणि एक मुलगा अशा चारही मुलांना महापालिकेत ठेकेदारामार्फत नोकरी मिळवून दिली आहे. मधुकर राऊत यांचा पगार मनपाकडून मिळणाऱ्या वाहन भत्त्यातून होतो. त्यांचा मुलगा जितेन राऊत (चालक), मुलगी मानसी राऊत (लिपिक), अपर्णा वैती - राऊत आणि सृष्टी वैती - राऊत (शिपाई) म्हणून महापालिकेत कार्यरत आहेत. त्यामुळे एकाच कुटुंबातील पाच जणांचा पगार मनपाच्या तिजोरीतून होत आहे. या नियुक्त्या कोणतीही अधिकृत रिक्त पदांची जाहिरात न काढताच झाल्या आहेत.

# राज्यातील ९ पक्षांची नोंदणी रद्द निवडणूक आयोगाची कारवाई

**देशात ३३४ पक्षांवर कारवाई**

■ मुंबई

**काँग्रेसचे** नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले असताना आता आयोगाने देशातील तब्बल ३३४ राजकीय पक्षांचे अस्तित्व उखडून टाकले आहे. या पक्षांची नोंदणी केंद्रीय निवडणूक आयोगाने रद्द केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ९ राजकीय पक्षांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील अवामी विकास पार्टी, बहुजन रयत पार्टी, भारतीय संग्राम परिषद, इंडियन मिलन पार्टी ऑफ इंडिया,नवभारत डेमोक्रॅटिक पार्टी, नवबहुजन समाजपरिवर्तन पार्टी, पीपल्स गार्डियन, द लोक पार्टी ऑफ इंडिया आणि युवा शक्ती संघटना या पक्षांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

जे पक्ष सलग सहा वर्षांपासून कोणत्याही निवडणूक प्रक्रियेत सहभागी झालेले नाहीत आणि ज्यांचा नोंदणीकृत पत्ता अस्तित्वात नाही अशा पक्षांवर निवडणूक आयोगाने ही कारवाई केली आहे.निवडणूक आयोगाने स्पष्ट केले की, लोकप्रतिनिधी कायदा १९५१ मधील कलम-२९ बी आणि कलम- २९ सी नुसार कोणत्याही राजकीय पक्षाने नोंदणी झाल्यानंतर पाच वर्षांच्या आत किमान एकदा निवडणूक लढवणे आवश्यक आहे. जर पक्षाने सलग सहा वर्षे कोणत्याही निवडणुकांत भाग घेतला नाही, तर त्याला आयोगाच्या यादीतून वगळले जाऊ शकते. नोंदणी रद्द झालेल्या पक्षांना आता लोकप्रतिनिधी कायदा आणि इतर संबंधित कायद्यांनुसार कोणतेही निवडणूक लाभ मिळणार नाहीत.

# मंत्रालयात १५ ऑगस्टपासून ऑफलाईन पासवर प्रवेश बंदी

■ मुंबई

**राज्यातील** विविध भागांतून मंत्रालयात येणाऱ्या नागरिकांसाठी १५ ऑगस्टपासून ऑफलाइन पास पूर्णपणे बंद करण्यात येणार आहेत. आता मंत्रालयात प्रवेशासाठी डीजी प्रवेश पवर नोंदणी करणे बंधनकारक राहील. नोंदणी केल्यानंतरच नागरिकांना मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे. पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानभवनाच्या लॉबीत झालेल्या हाणामारीच्या प्रकारानंतर सुरक्षेत तांत्रिक बदलांची प्रक्रिया सुरू झाली आहे. विशेष अधिकार समितीने विधान भवनातही चेहरा ओळख (फेस रेकग्निशन) प्रणाली बसवण्याची शक्यता तपासण्यास सुरुवात केली आहे. सध्या मंत्रालयाच्या गार्डन गेटजवळील १० खिडक्यांवर ऑफलाइन पास दिले जातात. गर्दी आणि सुरक्षेच्या कारणास्तव १५ ऑगस्टपासून या खिडक्यांवर पास देणे बंद केले जाईल. सध्या मंत्रालयात प्रवेशासाठी नागरिकांना तासनतास रांगा लावाव्या लागतात. मंत्री, आमदार आणि त्यांच्या अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी विशेषत: मंत्रिमंडळ बैठकीच्या वेळी मोठी गर्दी होते.

# सतिश उर्फ खोक्या भोसलेला न्यायालयाकडून जामीन मंजूर

**मात्र सुटका नाही**

■ बीड

**भाजपाचे** आष्टीचे आमदार सुरेश धस यांचा जवळचा कार्यकर्ता सतीश उर्फ खोक्या भोसले याचा जामीन अर्ज शिरूर कासार येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांनी मंजूर केला. हा जामीन वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणात मंजूर झाला. मात्र त्याच्यावर इतर गुन्हे असल्याने त्याची जेलमधून मुक्तता होणार नाही.

सतीश भोसले उर्फ खोक्या याच्यावर एकूण तीन गुन्हे दाखल आहेत. बुलडाणा जिल्ह्यातील एका व्यक्तीला बॅटने मारहाण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला



होता. या प्रकरणात गुन्हा दाखल आहे. बीडच्या शिरूर परिसरातील दिलीप ढाकणे आणि त्याचा मुलगा महेश ढाकणे यांना मारहाण केल्याप्रकरणीही त्याच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तर पाटोदा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी ८ मार्च रोजी खोक्याच्या घरावर छापा टाकून वन्यप्राण्यांच्या शिकारीचे साहित्य, प्राण्यांचे मांस आणि गांजा जप्त केला होता. त्यानंतर त्याला अटक झाली होती. वन्य जीवांचे मांस आढळून आल्याने त्याच्यावर वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणात तो न्यायालयीन कोठडीत होता. याच गुन्ह्यात आता त्याला जामीन मंजूर झाला आहे.

# महायुती सरकारविरोधात उबाठाचे आज आंदोलन

■ मुंबई

**महायुती** सरकारमधील भ्रष्ट मंत्र्यांच्या कारनाम्यांमुळे महाराष्ट्राची देशभरात बदनामी होत असल्याचा आरोप करत उबाठा उद्या दुपारी १२ वाजता राज्यभरात आंदोलन करणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयांसह मुंबईतील सर्व विभागांमध्ये हे आंदोलन होईल. मुंबईतील आंदोलनात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सहभागी होणार आहेत, अशी माहिती पक्ष कार्यालयातून देण्यात आली आहे. समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांचा ६० कोटींचा घोटाळा व १५०० कोटींचा गैरव्यवहार, माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे रमी खेळाचे डाव आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांबद्दल बोलताना ढेकळांचे पंचनामे करायचे का? असा विचारलेला प्रश्न, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मातोश्रीच्या नावे असलेला डान्सबार, सरकारमधील मंत्री व अधिकाऱ्यांचे हनीट्रॅप प्रकरण तसेच भ्रष्टाचाराची प्रकरणे समोर येऊनही मंत्र्यांचे राजीनामा न घेणारे सरकार याविरोधात हे आंदोलन करण्यात येणार आहे.

# ठाण्याच्या वाहतूक कोंडीवरून मनसेची शिंदे पितापुत्रावर टीका

**राजू पाटील यांची पोस्ट**

■ मुंबई

**मनसेचे** माजी आमदार राजू पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे या पितापुत्रांवर टीका केली आहे. ह्यांना ना जनाची ना मनाची, असे त्यांनी म्हटले आहे.

मनसेचे माजी आमदार राजू पाटील एक्सवर लिहिले की, रक्षाबंधनाच्या दिवशी नागरिकांना ट्रॅफिकचे आंदण आहे. वर्षानुवर्षे तोच रस्ता, तेच ट्रॅफिक, तीच घुसमट आणि तीच मागणी. आता आम्हालाही त्याच मुद्द्यावरून सरकारला शालजोडीत द्यायला लाज वाटू लागली. परंतु त्यांना नागरिकांच्या जीवाची, वेळेची आणि जीवनाची काहीही पडलेली नाही. रस्ते रुंदीकरण केले, कितीतरी ब्रिज बांधले त्याचा मलिदा खाऊन झाला. पुन्हा रस्ते आणि पूल दुरुस्त करण्याची वेळ आली आहे. म्हणजे पुन्हा मलिदा खाण्याची संधी उपलब्ध झाली आहे. पण ट्रॅफिक चा प्रश्न काही केल्या या आमच्या बालकमंत्र्याला सोडवता येत नाही. कारण या भ्रष्टनाथ मलिदा खाणाऱ्यांसाठी चॉपर आहेत, हवाईमार्ग आहेत, रस्त्यावरून जायची वेळ आली तर नागरिकांना थांबवून यांच्या गाड्यांसाठी रस्ता मोकळा करणारे ट्रॅफिक कंट्रोलर आहेत. सामान्य माणसाचे काय? कल्याण-डोंबिवलीकरांचे अर्ध आयुष्य या ट्रॅफिकच्या गर्दीतच सुरू होणार आणि या गर्दीतच संपणार. हे सत्ताधारी मात्र या टक्केवारीतून ओरबाडलेला पैसा वाटून दुसऱ्यांचे पक्ष फोडून आपली गद्दार गँग वाढविण्यात मग्न राहणार. खरेतर आश्चर्य त्या लोकांचे वाटते ज्या लोकांना या वाहतुककोंडीचा त्रास होतो.

# गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्याचे आज लोकार्पण

■ लातूर

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस उद्या लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात लातूर येथील जिल्हा परिषद प्रांगणात लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केले जाणार आहे.

या कार्यक्रमाला पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले अध्यक्षस्थानी आहेत. त्याचबरोबर लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# मराठा साम्राज्याच्या नकाशावर राजस्थानचा आक्षेप! समिती स्थापन

■ जयपूर

**देशात** नव्या शैक्षणिक धोरणानंतर आलेल्या पाठ्यपुस्तकांमध्ये इतिहासाच्या पुस्तकात राजस्थानचा भाग हा मराठा साम्राज्याच्या अधिपत्याखाली दाखवल्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी एनसीईआरटीने तज्ज्ञाची एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

हा नकाशा कोणी छापला व ते तज्ज्ञ नव्हते का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. एनसीईआरटी च्या आठवीच्या समाजशास्त्राच्या पुस्तकात मराठी साम्राज्याचा एक नकाशा दाखवण्यात आला आहे. यामध्ये राजस्थानचा बराच भाग व त्यातही जैसलमेर हे मराठा साम्राज्याच्या अधिपत्याखाली दाखवले आहे. राजस्थान मराठ्यांनी जिंकून घेतल्याचे कोणतेही ऐतिहासिक पुरावे नाहीत. त्यामुळे राजस्थानाने या नकाशावर आक्षेप घेतला आहे. कोणतेही पुरावे नसताना हा नकाशा कोणी छापला व ही पाठ्यपुस्तके तयार करणारी मंडळी कोण होती असा प्रश्न निर्माण केला जात आहे.